## प्रकरण तिसरे

## कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांचा इतिहास, विकास आणि प्रगती

### प्रास्ताविक -

महाराष्ट्रात मजूर सहकारी चळवळीची सुरूवात १९४८ पासून झालेली दिसून येते, तर सांगली जिल्ह्यात मजूर सहकारी चळवळीची सुरूवात १९५४ पासून [शिराळा येथे] सुरू झालेली दिसून येते. परंतू कवठे महांकाळ तालुक्यात मजूर सहकारी संस्था स्थापन करण्याचा विचार १९६६ पर्यंत कोणी केलेला नव्हता. तथापि सहकाराच्या इतर क्षेत्रात विविध सहकारी संस्था कवठे महांकाळ तालुक्यात कार्य करीत होत्या.

समाजातील दुर्बल व मागासलेल्या घटकांना रोजगार व योग्य मोबदला मिळवून देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी १९६६ मध्ये कवठे महांकाळ तालुक्यात पहिली "कवठे महांकाळ हमाल कामगार सहकारी सोसायटी लि., क. महांकाळ" या नांवाची हमालांची मजूर सहकारी संस्था स्थापन झाली.

एकेकाळी मिळेल ती मोलमजुरी व हमाली करून कसे तरी उपेक्षित जीवन जगणा-या कवठे महांकाळ येथील ११ हमालांनी एकत्र येऊन १६ ऑगस्ट १९६६ रोजी "हमाल कामगार सहकारी संस्थेची" स्थापना केली. ही संस्था स्थापन करण्यामध्ये त्यावेळचे या संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री. बापू म्हादू माने यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी स्वत: या संस्थेचे ५०० रूपयांचे भागभांडवल व इतर १० सभासदांचे प्रत्येकी

१० रुपये प्रमाणे १०० रुपयांचे भागभांडवल एकत्रित करून या संस्थेची स्थापना करून घेतली.

ही हमाल कामगार सहकारी संस्था १९६० मधील [सन १९६१ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४]कलम ९[१] अन्वये नोंदविली गेली आहे. आणि अधिनियम कलम १२[१] अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्थेचे नियम १९६१ मधील नियम क्रमांक १०[१] अन्वये संस्थेचे वर्गीकरण "उत्पादन संस्था उपवर्गीकरण" "मजूर औद्योगिक संस्था" असे करण्यात आले आहे.

हमाल कामगार सहकारी संस्था लि. कवठे महांकाळ ही संस्था स्थापन करण्या पाठीमागचा महत्वाचा उद्देश असा होता की "ही संस्था स्थापन करण्यापूर्वी कंत्राटदाराच्या हाताखाली हे हमाल लोक हमालीचे काम करून मिळेल ती तुटपुंजी मजुरी स्वीकारीत होते. परंतु जर सहकारी तत्वावर संघटित होऊन हमाल कामगार सहकारी संस्थेची स्थापना करून सभासदा करिता सरकारी गुदामातील धान्य उतरविणे, चढविणे, त्याचप्रमाणे सहकारी सोसायटयांचे खत उतरविणे, चढविणे इत्यादी कामे मक्त्याने घेतली तर या श्रमजीवी मंडळींना त्यांच्या श्रमाचा पुरेपूर मोबदला मिळेल"

या उद्देशाने स्थापन झालेल्या या हमाल कामगार सहकारी संस्थेच्या सभासदांना आता संघटितरीत्या काम केल्यामुळे त्यांना त्यांच्या कामाचा योग्य असा मोबदला मिळू लागला आहे.

१९६६ नंतर १९७४ पर्यंत कवठे महांकाळ तालुक्यात दुसरी मजूर सहकारी संस्था स्थापन झालेली दिसून येत नाही. परंतु १९७२ ला जो दुष्काळ पडला त्याची झळ कवठे महांकाळ तालुक्याला देखील पोहचली. शेतीचे उत्पादन कमी झाले. शेतकरी व शेतमजूरांना शेती व्यवसायात मिळणारा रोजगार अपुरा पडू लागला. कवठे महांकाळ तालुक्यात उपजीविकेची इतर साधने नसल्याने मजूरांना रोजगारासाठी

सरकारच्या विविध खात्यांतील श्रमजीवी कामाकडे वळावे लागले. अशी कामे मजूरांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊन त्यांना पुरेशी मजुरी मिळावी या उद्देशानेच कवठे महांकाळ तालुक्यातील जाखापूर येथील शेती व मजूरी करणाऱ्या ५० व्यक्तींनी सहकारी तत्वावर एकत्रित येऊन प्रत्येकी १० रुपये याप्रमाणे ५०० रुपयांचे भागभांडवल एकत्रित करून २ मार्च १९७४ रोजी "बजरंग मजूर सहकारी संस्था लि.,जाखापूर" या मजूर संस्थेची स्थापना केली. त्यावेळी या संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री दादाराम बापू चव्हाण हे होते. व इतर १४ संस्थापक सदस्य होते.

१९७२ नंतर आजपर्यंत सतत कवठे महांकाळ तालुक्यात दुष्काळ पडत गेल्याने कवठे महांकाळ तालुक्यातील लोकांना शेती व्यवसायावर अवलंबून राहणे अशक्य झाले. तसेच इतर प्रकारच्या रोजगाराच्या पुरेशा संधी या तालुक्यात उपलब्ध नसल्याने लोकांची विशेषत: शेतकरी व मजूरांची स्थिती दयनीय बनत गेली. अशा लोकांना नियमित रोजगार उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मजूर सहकारी संस्थांची गरज भासू लागली. तसेच शासनाच्या धोरणात होत गेलेले बदल, मजूर सहकारी संस्थांना दिल्या गेलेल्या सवलती, सरकारी कामे, दुष्काळी कामे, रोजगार हमीची कामे इ. बाबतीत मजूर सहकारी संस्थांना देण्यात आलेले प्राधान्य इत्यादी सर्वांचा परिणाम होऊन १९७४ नंतर कवठे महांकाळ तालुक्यात मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत वाढ होत गेलेली दिसून येते.

कवठे महांकाळ तालुक्यात मजूर सहकारी संस्थांची प्रगती कशी होत गेली आहे. ती तक्ता क्रमांक ३.१ वरून दिसून येईल :-

## तक्ता क्रमांक - ३.१

## कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांची प्रगती

| अ.नं. | संस्थेचे नांव | रजिस्ट्रेशन नंबर | स्थापना दिनांक |
|---|---|---|---|
| १. | क.महांकाळ हमाल कामगार सहकारी संस्था लि.,क. महांकाळ | ३१६ | १६-८-१९६६ |
| २. | बजरंग मजूर सहकारी संस्था लि., जाखापूर | ३३५ | २-३-१९७४ |
| ३. | अग्रेश्वर मजूर सहकारी संस्था लि., शिरढोण | ४०० | २९-८-१९७५ |
| ४. | गणपती मजूर सहकारी संस्था लि., अलकूड [एस] | ४०६ | ३०-११-१९७५ |
| ५. | सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि., नागज | २४१ | १४-४-१९७६ |
| ६. | रेणुका मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ | १२९ | १५-२-१९७७ |
| ७. | म्हाळसाकांत मजूर सहकारी संस्था लि., कुची | ४२० | २०-६-१९७७ |
| ८. | यशोदा मजूर सहकारी संस्था लि., घाटनांद्रे | ४२५ | १-१२-१९७७ |
| ९. | लक्ष्मी मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ | १३४ | ६-५-१९७८ |
| १०. | सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि., वाघोली | ४२७ | २-९-१९७८ |

| अ.नं. | संस्थेचे नांव | रजिस्ट्रेशन नंबर | स्थापना दिनांक |
|---|---|---|---|
| ११. | गजराज मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ | ४३९ | ३१-३-१९७९ |
| १२. | जनसेवा मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ | ९०१ | ६-८-१९७९ |
| १३. | महादेव मजूर सहकारी संस्था लि., रायेवाडी | ९०६ | १५-१२-१९७९ |
| १४. | विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., लंगरपेठ | ९०७ | १५-२-१९८१ |
| १५. | साईनाथ मजूर सहकारी संस्था लि., लांडगेवाडी | १०३१ | २८-६-१९८३ |
| १६. | विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., बनेवाडी | ५०१ | १९-६-१९८४ |

आधार - सांगली जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन लि., सांगली वार्षिक अहवाल, १९८८.

वरील तक्ता क्रमांक ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आज कवठे महांकाळ तालुक्यात १६ मजूर सहकारी संस्था कार्य करीत असल्या तरी या संशोधन विषयाचा कालखंड १९८३-८४ ते १९८७-८८ असा पाच वर्षांचा निवडलेला असल्याने ज्या मजूर सहकारी संस्थांची १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीमधील, सभासदाची संख्या, त्यांचे भागभांडवल, रिझर्व्ह फंड, घेतलेली कर्जे, केलेली गुंतवणूक, खेळते भांडवल, हत्यारे-अवजारांची किंमत, केलेल्या कामाचे मूल्य, काम उपलब्ध करुन दिलेल्या मजूरांची संख्या, मजूरांना दिलेली मजुरी, मजूरांना मिळालेल्या कामाचे दिवस, मिळालेले उत्पन्न, झालेला -

व्यवस्थापकीय खर्च आणि झालेला नफा व तोटा मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण इ. सर्व प्रकारची माहिती व आकडेवारी उपलब्ध होऊ शकली अशा तक्ता क्रमांक ३.२ मध्ये दर्शविलेल्या दहा मजूर सहकारी संस्थांचा या ठिकाणी सखोलपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तक्ता क्रमांक ३.२

अभ्यासासाठी निवडलेल्या कवठे महांकाळ तालुक्यातील
मजूर सहकारी संस्था

| अ.नं. | मजूर सहकारी संस्थेचे नांव |
|---|---|
| १. | क.महांकाळ हमाल कामगार सहकारी संस्था लि.,क.महांकाळ |
| २. | बंजरंग मजूर सहकारी संस्था लि., जाखापूर |
| ३. | म्हाळसाकांत मजूर सहकारी संस्था लि., कुची |
| ४. | यशोदा मजूर सहकारी संस्था लि., घाटनांद्रे |
| ५. | लक्ष्मी मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ |
| ६. | सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि., वाघोली |
| ७. | गजराज मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ |
| ८. | विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., लंगरपेठ |
| ९. | साईनाथ मजूर सहकारी संस्था लि., लांडगेवाडी |
| १०. | विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., बनेवाडी |

कवठे महांकाळ तालुक्यातील तक्ता क्रमांक ३.२ मधील मजूर सहकारी संस्थांचा १९८३-१९८४ ते १९८७-८८ या पाच वर्षाच्या कालखंडातील वाढ आणि विकास कशा पध्दतीने झाला आहे हे निवडक दर्शकांवरुन समजून येते आणि या मजूर सहकारी संस्थांच्या विकासाचे चित्र आपल्यासमोर येते, यासाठीच पुढील निवडक

दर्शक अभ्यासासाठी घेतले आहेत.

१. सभासद संख्या

२. भागभांडवल

३. राखीव निधी

४. घेतलेली कर्जे

५. हत्यारे-अवजारांची किंमत

६. केलेली गुंतवणूक

७. खेळते भांडवल

८. केलेल्या कामाचे मूल्य

९. काम मिळालेल्या मजूरांची संख्या

१०. मजूरांना दिलेली मजुरी

११. मजूरांना मिळालेल्या कामाचे सरासरी दिवस

१२. मजूर सहकारी संस्थांना मिळालेले उत्पन्न

१३. व्यवस्थापकीय खर्च

१४. मजूर सहकारी संस्थांचा नफा-तोटा.

१५. मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण

या निवडक दर्शकांचे आधारे १९८३-८४ ते १९८७-८८ या काळाचा संदर्भ घेऊन पुढील विश्लेषण केले आहे. या काळातील वरील दर्शकांची पाहाणी केली असता कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांचा विकास व त्यातील बदल ध्यानात येतील :-

सभासद संख्या -

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी अभ्यासासाठी निवडलेल्या दहा मजूर सहकारी संस्थांच्या संदर्भातील मजूर सभासदांचे चित्र तक्ता

| अ.नं. | मजूर सहकारी सं | १९८७-८८ | |
| --- | --- | --- | --- |
| | गींय | एकूण | मागासवर्गीय |
| १. | हमाल कामगार सहकारी क्र. महांकाळ | १५ | ०० |
| २. | बजरंग मजूर सहकारी संस्थ | २५ | ०० |
| ३. | म्हाळसाकांत मजूर सहकार | ३७ | १६ |
| ४. | यशोदा मजूर सहकारी संस | २३ | ०८ |
| ५. | लक्ष्मी मजूर सहकारी संस्थ | ३९ | ०३ |
| ६. | सिध्देश्वर मजूर सहकारी | ५५ | १२ |
| ७. | गजराज मजूर सहकारी संस | १९ | ०७ |
| ८. | विठ्ठल मजूर सहकारी संस | २१ | ०० |
| ९. | साईनाथ मजूर सहकारी संर | १५ | ०५ |
| १०. | विठ्ठल मजूर सहकारी संस | १७ | ०० |
| | एकूण | २६६ | ५१ |

आधार - वरील मजूर सहक

क्रमांक ३.३ वरून समजून येईल.

या मजूर सहकारी संस्थांच्या एकूण सभासदांची संख्या १९८३-८४ साली ४३२, १९८४-८५ साली ४२८, १९८५-८६ साली ४२७, १९८६-८७ साली ४१० तर १९८७-८८ साली २६६ झालेली दिसून येते. यावरून असे दिसून येते की १९८३-८४ नंतर मजूर सहकारी संस्थांच्या सभासद संख्येत वाढ तर झालेलीच नाही. उलट नंतरच्या तीन वर्षांच्या काळात सभासदांचा राजीनामा व सभासदांचा मृत्यू यामुळे सभासद संख्येत अल्पशा प्रमाणात घट झालेली दिसून येते.

१९८७-८८ मध्ये एकूण सभासद संख्या २६६ वर आली. १९८६-८७ ते १९८७-८८ या एका वर्षात १४४ सभासद कमी झाले. म्हणजेच या एकाच वर्षात मजूर सहकारी संस्थांच्या सभासद संख्येत ३५.१२ % घट झाली आहे. १९८७-८८ या वर्षात मजूर सहकारी संस्थांच्या एकूण सभासद संख्येत एवढी मोठी घट होण्याची कारणे शोधली असता या संदर्भात एकच प्रामुख्याने कारण दिसून आले ते म्हणजे -

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक एलसीएस १०७७/५५९३३/का-२७ दिनांक ३० मार्च १९७९ आणि शासन निर्णय क्रमांक एलसीएस १०८३/८४७१४/७९८/मि.व्य.-३ दि.५ डिसेंबर १९८४ अन्वये मजूर सहकारी संस्थांना ज्या सवलती दिल्या होत्या त्या सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक एलएबी १०८६/सी.आर २९६/का-इमारती-२ दिनांक २२-१०-१९८६ अन्वये रद्द करण्यात आल्या. याला स्थगिती मिळावी म्हणून जिल्हा मजूर सहकारी संस्थांचा राज्य संघ यांनी मुंबई उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. त्या अर्जाची सुनावणी होईपर्यंत मध्यंतरीच्या काळात कार्यवाही करण्याबाबत उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले, ते म्हणजे -

१. मजुरीचे काम न करणा-या सर्व सभासदांना काढून टाकतील.

२. मजूर सभासदाना ओळखपत्रे देण्याचे मान्य करतील.

३. सभासदांची बँकेत खाती उघडून त्यांना धनादेशाव्दारे मजुरीची रक्कम देण्यास तयार होतील, आणि

४. सभासदांसाठी आपघाती विमा योजना सुरू करतील.

अशा मजूर सहकारी संस्थांना दिनांक २२-१०-१९८६ च्या आदेशापूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व सवलती चालू ठेवाव्यात.

हे अंतरिम आदेश दिनांक ३ सप्टेंबर १९८७ च्या शासन निर्णयान्वये कायम करण्यात आले. या वरील अंतरिम आदेशामुळे १९८७-८८ यावर्षी मजूर सहकारी संस्थांची एकूण सभासद संख्या कमी झालेली आहे. याचा अर्थ यापूर्वी या मजूर सहकारी संस्थामध्ये मजुरीचे काम न करणा-या सभासदांची संख्या अधिक होती.

परंतु तक्ता क्रमांक ३.३ लक्षात घेता १९८७-८८ मध्ये लक्ष्मी मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ आणि सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि., बोरगोळी यांच्या सभासद संख्येत वाढ झाली आहे, तर म्हाळसाकांत मजूर सहकारी संस्था लि., कुची या संस्थेची सभासद संख्या स्थिर राहिलेली आहे असे दिसून येते. म्हणजेच या संस्थांनी मजुरीचे काम करणा-यांनाच सभासद करून घेतलेले दिसते. व इतर राहिलेल्या मजूर सहकारी संस्थांनी मजुरीचे काम न करणा-या सभासदांना यावर्षी कमी केलेले दिसते, यामुळे १९८७-८८ या वर्षी या दहा संस्थांची एकूण सभासद संख्या खूपच घटलेली आहे.

मजूर सहकारी संस्था या प्रामुख्याने शेतमजूर, सीमांत शेतकरी, मागासवर्गीय, दुर्बल घटकांच्यासाठी असाव्यात असे गृहीत धरून जेंव्हा वरील दहा मजूर सहकारी संस्थांच्या संदर्भात एकूण सभासदामध्ये मागासवर्गीय सभासद किती आहेत याचा अभ्यास केला असता पुढील चित्र दिसून आले.

१९८३-८४ साली एकूण ४३२ मजूर सभासदापैकी ८८ मागासवर्गीय मजूर सभासद होते. म्हणजे त्यांचे एकूण सभासदाशी असणारे प्रमाण २०.३७ टक्के होते. तर हे प्रमाण १९८४-८५ मध्ये २०.७९ टक्के, १९८५-८६ मध्ये २२.२५ टक्के १९८६-८७ मध्ये २२.६८ टक्के आणि १९८७-८८ मध्ये १९.१७ टक्के होते. म्हणजेच १९८३-८४ ते १९८६-८७ या काळात मागासवर्गीय मजूर सभासदांचे एकूण मजूर सभासदांशी असणारे प्रमाण अल्प प्रमाणात वाढलेले दिसते. मात्र १९८७-८८ मध्ये हे प्रमाण कमी झालेले दिसून येते. मात्र या मजूर सहकारी संस्थांमधून मागासवर्गीय मजूर सभासदांचे प्रमाण एकूण सभासदांशी तुलना करता प्रत्येक वर्षी फारच अल्प आहे. १९८७-८८ मध्ये वरील १० पैकी ४ मजूर सहकारी संस्थांमध्ये एकही मागासवर्गीय सभासद नव्हता.

भागभांडवल -

भाग भांडवल हा खेळत्या भांडवलातील एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. एकूण भाग भांडवला मध्ये सभासदाचे भागभांडवल आणि सरकारचे भागभांडवल यांचा समावेश होतो. तक्ता क्रमांक ३.४ वरून असे दिसून येते की १९८३-८४ ते १९८७-८८ या काळात सरकारने घेतलेल्या या मजूर सहकारी संस्थांच्या भाग भांडवलात वाढ झालेली नाही, उलट १९८७-८८ मध्ये त्यात घटच झालेली आहे तक्ता क्रमांक ३.४ मधील १० मजूर सहकारी संस्थांपैकी हमाल कामगार सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ, बजरंग मजूर सहकारी संस्था लि., जाखापूर, साईनाथ मजूर सहकारी संस्था लि., लांडगेवाडी आणि विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., बनेवाडी या मजूर सहकारी संस्थांकडे १९८३-८४ ते १९८७-८८ या काळात सरकारने भाग भांडवल घेतलेले दिसत नाही.

१९८३-८४ मध्ये एकूण भाग भांडवल ५६,८९५ रूपये होते त्यापैकी ३८,८९५ रूपये सभासद भाग भांडवल आणि १८,००० रूपये सरकारचे भागभांडवल

| ८७ | | | १९८७-८८ | |
| --- | --- | --- | --- | --- |
| कार | एकूण | सभासद | सरकार | एकूण |
| | १३३५ | १३८५ | – | १३८५ |
| | ३११० | २८६० | – | २८६० |
| ० | ६६०० | ३६०० | ३००० | ६६०० |
| ० | ९१०० | ६१०० | १५०० | ७६०० |
| ० | ६००० | ३०४० | ३००० | ६०४० |
| ० | १०१०० | ३३२० | ३००० | ६३२० |
| ० | १०७४० | ७७४० | ३००० | १०७४० |
| ० | ६००० | ३००० | ३००० | ६००० |
| | २९६० | २१७० | – | २१७० |
| १ | ४२१० | ४२१० | – | ४२१० |
| | ६०१५५ | ३७४२५ | १६५०० | ५३९२५ |

होते, म्हणजे यावर्षी एकूण भाग भांडवला पैकी सरकारचे भाग भांडवल ३१.६४ टक्के तर सभासदांचे भाग भांडवल ६८.३६ टक्के होते. १९८४-८५ मध्ये एकूण भागभांडवल ६२,१३५ रुपये होते त्या पैकी ४४,१३५ रुपये सभासदांचे आणि १८,००० रुपये सरकारचे भाग भांडवल होते. म्हणजे यावर्षी एकूण भाग भांडवलापैकी २८.९७ टक्के सरकारचे आणि ७१.०३ टक्के सभासदांचे भाग भांडवल होते. १९८५-८६ मध्ये मजूर सहकारी संस्थांच्या एकूण, सरकारी आणि सभासदांच्या भाग भांडवलात कोणताही बदल झालेला नाही. तर १९८६-८७ मध्ये एकूण भाग भांडवल ६०,१५५ रुपये होते. त्यापैकी ४२,१५५ रुपये सभासदांचे आणि १८,००० रुपये सरकारचे भागभांडवल होते म्हणजे यावर्षी एकूण भागभांडवला-पैकी २९.९२ टक्के सरकारचे आणि ७०.०८ टक्के सभासदांचे भागभांडवल होते. १९८७-८८ मध्ये एकूण भांडवल ५३,९२५ रुपये होते. त्यापैकी ३७,४२५ रुपये सभासदांचे आणि १६,५०० रुपये सरकारचे भागभांडवल होते. यावर्षी सरकारी भाग भांडवल कमी होण्याचे कारण म्हणजे यशोदा मजूर सहकारी संस्था लि. घाटनांद्रे या संस्थेने १५०० रुपये सरकारचे भाग भांडवल परत केले आहे. यावर्षी एकूण भाग भांडवला पैकी सरकारचे भाग भांडवल ३०.६० टक्के आणि सभासंदाचे भाग भांडवल ६९.४० टक्के होते. म्हणजेच या पाच वर्षात मजूर सहकारी संस्थांच्या एकूण भाग भांडवला पैकी सरकारचे भाग भांडवल २८.९७ टक्के ते ३१.६४ टक्के च्या दरम्यान असलेले दिसले तर सभासंदांचे भाग भांडवल ६८.३६ टक्के ते ७१.९७ टक्केच्या दरम्यान असलेले दिसून येते.

तक्ता क्रमांक ३.४ लक्षात घेता असे दिसून येते की १९८३-८४ च्या तुलनेने १९८४-८५ या वर्षी मजूर सहकारी संस्थांच्या एकूण भाग भांडवलात ९.२१ टक्याने वाढ झाली तर १९८४-८५ च्या तुलनेने १९८५-८६ यावर्षी एकूण भाग भांडवल स्थिर राहिलेले आहे. १९८५-८६ च्या तुलनेने १९८६-८७ या वर्षी या मजूर सहकारी संस्थांच्या एकूण भाग भांडवलात ३.१९ टक्क्याने

घट झाली आहे तर १९८६-८७ च्या तुलेनेने १९८७-८८ या वर्षी मजूर सहकारी संस्थांच्या एकूण भाग भांडवलात १०.३६ टक्क्यानी घट झालेली आहे. म्हणजेच १९८५-८६ पासून मजूर सहकारी संस्थांच्या एकूण भाग भांडवलात घट होत गेलेली दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने सभासद भाग भांडवलात घट झाल्याचे दिसून येते, कारण मजूर सहकारी संस्थांचे मयत सभासद व राजीनामा दिलेले सभासद यांचे भाग भांडवल परत केलेले आहे.

## राखीव निधी -

राखीव निधी आणि भाग भांडवल मिळून मजूर सहकारी संस्थांचा स्वत:च्या मालकीचा निधी निर्माण झालेला असतो. यामध्ये राखीव निधी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्याचे कारण म्हणजे राखीव निधी कोणत्याही परिस्थितीत मजूर सहकारी संस्थेकडेच राहतो, सभासदाच्या राजीनाम्यानंतर सभासद आपले भागभांडवल संस्थेमधून काढून घेऊ शकतो, परंतु राखीव निधीबाबत सभासदास कांही करता येत नाही. सरकारी कायदयाप्रमाणे मजूर सहकारी संस्थांना होणा-या नफ्याच्या २५ टक्के रक्कम राखीव निधीत ठेवावी लागते. या राखीव निधीचा वापर संस्था आर्थिकदृटया संकटात आली असता केला जातो.

परंतु तक्ता क्रमांक ३.५ मधील मजूर सहकारी संस्थांचा १९८३-८४ ते १९८६-८७ या वर्षातील राखीव निधी लक्षात घेतला असता असे दिसून येते की, यशोदा मजूर सहकारी संस्था लि., घाटनांद्रे ही संस्था वगळता इतर कोणत्याही मजूर सहकारी संस्थांच्या राखीव निधीत फारसा बदल झालेला नाही. १९८३-८४ मध्ये या मजूर सहकारी संस्थांचा एकूण राखीव निधी १३७४ रुपये होता, तो १९८६-८७ मध्ये २००४ रुपये झाला. मात्र १९८७-८८ मध्ये सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि., वाघोली आणि गजराज मजूर सहकारी संस्था लि.,

| अ.नं. | मजूर सहकारी | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|
| १. | हमाल कामगार | २९ | २९ |
| २. | बजरंग मजूर सह | ५१ | ५१ |
| ३. | म्हाळसाकांत म | ३६ | ३६ |
| ४. | यशोदा मजूर स | १६०२ | ९६७३ |
| ५. | लक्ष्मी मजूर सह | ३५ | ३९ |
| ६. | सिध्देश्वर मजूर | ३३ | ५५ |
| ७. | गजराज मजूर स | ६५ | ६५ |
| ८. | विठ्ठल मजूर स | ५१ | ५१ |
| ९. | साईनाथ मजूर | ५१ | ५१ |
| १०. | विठ्ठल मजूर सा | ५१ | ५१ |
| | एकूण | २००४ | १०१०१ |

आधार - तक्त

क.महांकाळ या संस्थांच्या राखीव निधीत अल्प प्रमाणात वाढ झालेली दिसते. तर यशोदा मजूर सहकारी संस्था लि., घाटनांद्रे या संस्थेच्या राखीव निधीत मागील वर्षापेक्षा ८०७१ रुपये वाढ झाली. ही वाढ जवळजवळ ६ पट इतकी आहे. यामुळे १९८७-८८ मध्ये या मजूर सहकारी संस्थांचा एकूण राखीव निधी १०,१०१ रुपये इतका झाला.

या मजूर सहकारी संस्थांचा राखीव निधी लक्षात घेता असे दिसून येते की या संस्थांनी सहकारी कायदयाप्रमाणे होणा-या नफ्यातील २५ टक्के भाग राखीव निधीमध्ये जमा केलेला नाही, परंतु भविष्य काळातील आर्थिक संकटे लक्षात घेऊन या संस्थानी राखीव निधीतील रक्कम वाढविणे व सहकारी कायदयाचे पालन करणे गरजेचे आहे.

कर्जे -

मजूर सहकारी संस्थांना मिळालेली कामे पूर्ण करण्यासाठी भांडवलाची गरज असते व ही गरज स्वत:च्या मालकीचे भांडवल, कामे देणा-या खात्यांच्याकडून कामांच्या किंमतीच्या २० टक्के अग्रीम म्हणून मिळणारी रक्कम, मजूर सहकारी संस्थांना मिळालेल्या एकूण कामांच्या किंमतीच्या ६५ टक्के रक्कम खेळते भांडवल म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मिळणारा अग्रीम आणि इतर वित्तीय संस्था आणि बँकाच्या कडून कर्जे घेऊन मजूर सहकारी संस्था पूर्ण करतात. परंतु कवठे महांकाळ तालुक्यातील तक्ता क्रमांक ३.६ मधील मजूर सहकारी संस्थांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की या मजूर सहकारी संस्थांनी १९८३-८४ ते १९८७-८८ या पाच वर्षाच्या काळात कोणत्याही बँका अगर वित्तीय संस्थांच्याकडून कर्जे घेतलेली नाहीत. फक्त सरकारकडून हत्यारे व अवजारे यासाठी मिळणारी जी कर्जे आहेत तीच कर्जे या मजूर सहकारी संस्थांनी घेतलेली दिसून येतात. यामध्ये देखील बजरंग मजूर सहकारी संस्था लि., जाखापूर

ग्यांत ]

| अ.नं. | मजूर सहकारी | १९८६-८७ | १९८७-८८ |
| --- | --- | --- | --- |
| १. | हमाल कामगा | - | - |
| २. | बजरंग मजूर स | - | - |
| ३. | म्हाळसाकांत | २७५ | २७५ |
| ४. | यशोदा मजूर | १०० | - |
| ५. | लक्ष्मी मजूर स | ५०० | ५०० |
| ६. | सिध्देश्वर मजू | ४०० | ४०० |
| ७. | गजराज मजूर | २०० | १०० |
| ८. | विठ्ठल मजूर | ४०० | ३०० |
| ९. | साईनाथ मजूर | - | - |
| १०. | विठ्ठल मजूर | - | - |
| | एकूण | १८७५ | १५७५ |

आधार - तक

साईनाथ मजूर सहकारी संस्था लि., लांडगेवाडी, विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., बनेवाडी यांनी हत्यारे व अवजारांसाठी सरकारकडून कर्जे घेतलेली दिसत नाहीत. तर हमाल कामगारांना हत्यारे व अवजारांची गरज नसल्याने हमाल कामगार सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ या संस्थेनेही सरकारकडून कर्जे घेतलेली दिसून येत नाहीत. मात्र इतर ज्या मजूर सहकारी संस्थांनी हत्यारे व अवजार यासाठी सरकारकडून १९८३-८४ ते १९८७-८८ या वर्षात कर्जे घेतली आहेत ती तक्ता क्रमांक ३.६ वरून लक्षात घेता असे दिसून येते की १९८३-८४ मध्ये एकूण कर्ज ३४०० रुपये होते, १९८४-८५ मध्ये २७०० रुपये होते, १९८५-८६ मध्ये २३७५ रुपये होते तर १९८६-८७ मध्ये १८७५ रुपये आणि १९८७-८८ मध्ये १५७५ रुपये होते. म्हणजेच मजूर सहकारी संस्थांच्या या कर्जामध्ये १९८३-८४ ते १९८७-८८ या काळात सतत घटच होत गेलेली आहे. कारण मजूर सहकारी संस्थांनी सरकारकडून जी कर्जे घेतलेली होती त्या कर्जाची त्यांनी प्रत्येक वर्षी फेड केलेली आहे. तर मजूर सहकारी संस्थांच्या सभासद संख्येत वाढ न झाल्याने नवीन हत्यारे व अवजारासाठी या संस्थांनी नवीन कर्जे घेतलेली नाहीत.

## हत्यारे अवजारांची किंमत -

मजूर सहकारी संस्थांना आपल्या मजूर सभासदांच्यासाहयाने मजूरीची कामे पूर्ण करून घेण्यासाठी स्वत:च्या मालकीची काही हत्यारे अवजारे अवश्यक असतात. हत्यारे अवजारांची खेरेदी करण्यासाठी काही प्रमाणात मजूर सहकारी संस्थांना सरकार कडून कर्जे मिळतात. हत्यारे अवजारे यामध्ये प्रामुख्याने टिकाव, खोरी, पहार, फावडी, लोखंडी पाटया, हातोडा, घण, सुतकी मोजमाप पट्टी इ.चा समावेश होतो.

तक्ता क्रमांक ३.७ मधील कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांच्याकडील १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीतील हत्यारे, अवजारे यांच्या

ा ]

| अ.नं. | | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|
| १. | हमाल क | - | - |
| २. | बजरंग म | - | - |
| ३. | म्हाळसा | १४९६ | १३५६ |
| ४. | यशोदा | ८४१ | ७५६ |
| ५. | लक्ष्मी म | ११४५ | ११४७ |
| ६. | सिध्देश्व | १४५२ | १४५२ |
| ७. | गजराज | १७८८ | १६१० |
| ८. | विठ्ठ म | १२२५ | ११०० |
| ९. | साईनाथ | ८८५ | ७६० |
| १०. | विठ्ठल | ५७१ | ५१४ |
| | एकूण | ९४०३ | ८६९५ |

आधार -

किंमतींचा अभ्यास करता असे आढळून येईल की १९८३-८४ ते १९८७-८८ या काळात बजरंग मजूर सहकारी संस्था लि.,जाखापूर या संस्थेकडे स्वत:च्या मालकीची हत्यारे, अवजारे असलेली दिसून येत नाहीत. तर हमाल कामगारांना हत्यारे,अवजारांची गरज नसल्याने याच काळात हमाल कामगार सहकारी संस्था लि., क. महाकांळ या संस्थेकडे हत्यारे,अवजारे असलेली दिसत नाहीत. तर साईनाथ मजूर सहकारी संस्था लि., लांडगेवाडी ही १९८३ मध्ये तर विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि.,बनेवाडी ही १९८४ मध्ये स्थापन झाल्याने १९८३-८४ यावर्षी या दोन्ही संस्थांच्याकडे हत्यारे, अवजारे असलेली दिसून येत नाहीत. राहिलेल्या इतर मजूर सहकारी संस्थांच्याकडील हत्यारे, अवजारांच्या किंमती लक्षात घेता असे दिसून येईल की १९८३-८४ मध्ये मजूर सहकारी संस्थांच्याकडील हत्यारे अवजारांची एकूण किंमत १०,२९१ रुपये होती ती १९८४-८५ मध्ये १०,३२० रुपये झाली. यावर्षी हत्यारे अवजारांच्या किंमतीत वाढ होण्याचे कारण म्हणजे साईनाथ मजूर सहकारी संस्था लि., लांडगेवाडी, विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., बनेवाडी आणि सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि., वाघोली यांनी यावर्षी स्वत:च्या मालकीची काही हत्यारे,अवजारे खरेदी केलेली होती. मात्र याच वर्षी इतर संस्थांच्या कडील हत्यारे अवजारांच्या किंमतीत घट झालेली दिसते.

१९८५-८६ मध्ये हत्यारे अवजारांची किंमत ९४४८ रुपये होती तर १९८६-८७ मध्ये ९४०३ रुपये इतकी होती आणि १९८७-८८ मध्ये ती ८६९५ रुपये इतकी झाली. १९८४-८५ ते १९८७-८८ या कालावधीचा विचार करता मजूर सहकारी संस्थांच्याकडील हत्यारे-अवजारांच्या किंमती सातत्याने घटतच गेलेल्या दिसतात. या काळात झालेली घट १५.७५ टक्के आहे. ही घट होण्याचे कारण म्हणजे या कालावधीत मजूर सहकारी संस्थांनी नवीन हत्यारे अवजारांची खरेदी केलेली नाही. उलट आहे त्या हत्यारे वापर केल्याने त्यांची झीज होऊन त्यांची किंमत कमी होत गेलेली आहे.

मजूर सहकारी संस्थांनी केलेली गुंतवणूक :-

तक्ता क्रमांक ३.८ मधील मजूर सहकारी संस्थांनी केलेली गुंतवणूक लक्षात घेता या संस्थांनी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केचे भाग [शेअर्स], सांगली जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन यांचे भाग, ग्राहक सहकारी संस्थांचे भाग, मुदत ठेव, अल्प बचत, इंदिरा विकास पत्रे, भागविमोचन निधी इत्यादींमध्ये गुंतवणूक केलेली दिसून येते. अशा प्रकारची या मजूर सहकारी संस्थांची एकूण गुंतवणूक १९८३-८४ मध्ये ४३०५ रुपये, १९८४-८५ मध्ये ४६८० रुपये १९८५-८६ मध्ये ५६५० रुपये तर १९८६-८७ मध्ये ६२६० रुपये होती ती १९८७-८८ मध्ये १५,०१० रु. इतकी झाली. म्हणजेच १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीत मजूर सहकारी संस्थांच्या एकूण गुंतवणूकीत सातत्याने वाढ होत गेलेली आहे. ही वाढ १९८३-८४ च्या तुलनेने १९८४-८५ यावर्षी ८.७१ टक्के, १९८४-८५ च्या तुलनेने १९८५-८६ या वर्षी २०.७२ टक्के, १९८५-८६ च्या तुलनेने १९८६-८७ यावर्षी १०.८० टक्के आणि १९८६-८७ च्या तुलनेने १९८७-८८ यावर्षी १३९.७८ टक्क्यानी झालेली दिसून येते. १९८७-८८ या वर्षातमोठ्या प्रमाणात गुंतवणुकीत वाढ होण्याचे कारण म्हणजे यशोदा मजूर सहकारी संस्था लि., घाटनांद्रे या संस्थेने ५००० रुपयांची मुदत ठेव आणि १५०० रुपयांचे सांगली जिल्हा मध्यवर्ती बॅन्केचे भाग यामध्ये गुंतवणूक केली आहे तर गजराज मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ या संस्थेने इंदिरा विकास पत्र आणि मुदत ठेव यामध्ये १२५० रुपये आणि विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि., लंगरपेठ या संस्थेने १००० रुपयांची इंदिरा विकास पत्रे यामध्ये १९८७-८८ साली नव्याने गुंतवणूक केली.

परंतु हमाल कामगार सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ, लक्ष्मी मजूर सहकारी संस्था लि., कवठे महांकाळ, सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि., वाघोली साईनाथ मजूर सहकारी संस्था लि., लांडगेवाडी आणि विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि. बनेवाडी या संस्थांची १९८३-८४ यावर्षी जेवढी गुंतवणूक होती तेवढीच १९८७-८८

| अ. नं. | | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|
| १. | हम | ९५० | ९५० |
| २. | बज | १०५० | १०५० |
| ३. | म्ह | ५५० | ५५० |
| ४. | यश | ७६० | ७२६० |
| ५. | लक्ष | ६५० | ६५० |
| ६. | सि | १५० | १५० |
| ७. | गज | १२५० | २५०० |
| ८. | वि | ६५० | १६५० |
| ९. | सा | १५० | १५० |
| १०. | वि | १०० | १०० |
| | एकू | ६२६० | १५०१० |

आ

अखेर असलेली दिसून येते. म्हणजेच या संस्थांनी या पाच वर्षांच्या काळात कोणत्याच प्रकारची नवीन गुंतवणूक केलेली नाही.

खेळते भांडवल -

मजूर सहकारी संस्थांच्या खेळत्या भांडवलात प्रामुख्याने भागभांडवल, संस्थांना होणारा नफा, काम देणा-या खात्याच्या कडून मिळणारा अग्रीम, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मिळणारा अग्रीम आणि रोख कर्ज [कॅश केडिट], अनामत रक्कमा इ. घटकांचा समावेश होतो.

तक्ता क्रमांक ३.९ मध्ये दर्शविलेले कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांचे एकूण खेळते भांडवल लक्षात घेता असे दिसून येते की १९८३-८४ मध्ये ते ११,४४,६३४ रुपये होते ते १९८४-८५ मध्ये ११,१०,४१२ रुपये झाले. १९८५-८६ मध्ये ते १७,५०,५५६ रुपये झाले. १९८६-८७ मध्ये ते १९,७०,८९० रुपये झाले तर १९८७-८८ मध्ये परत या संस्थांच्या खेळत्या भांडवलात घट होऊन ते ११,२०,८६० रुपये झाले. म्हणजेच १९८३-८४ च्या तुलनेने १९८४-८५ या वर्षी खेळत्या भांडवलात २.९९ टक्क्यांनी घट झाली आहे. तर १९८४-८५ च्या तुलनेने १९८५-८६ यावर्षी खेळत्या भांडवलात ५७.६५ टक्क्यांनी वाढ झाली. १९८५-८६ च्या तुलनेने १९८६-८७ या वर्षी खेळते भांडवल १२.५९ टक्क्यांनी वाढलेले दिसते. मात्र १९८६-८७ च्या तुलनेत १९८७-८८ यावर्षी मजूर सहकारी संस्थांच्या खेळत्या भांडवलात ४३.१३ टक्क्याने घट झालेली दिसून येते.

१९८४-८५ आणि १९८७-८८ या वर्षी खेळत्या भांडवलात घट होण्याचे कारण म्हणजे यावर्षी मजूर सहकारी संस्थांच्या कामाच्या मूल्यात घट झालेली होती.

| अ.नं. | मजूर स | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|
| १. | हमाल कामगा | २९०१७ | ३२५३० |
| २. | बजरंग मजूर स | १४२४४२ | ९८२२१ |
| ३. | म्हाळसाकांत | ७८८८५ | २५१८१ |
| ४. | यशोदा मजूर | ६९९५९७ | ३५६२१५ |
| ५. | लक्ष्मी मजूर स | ३२४५४० | २५९१५४ |
| ६. | सिध्देश्वर मजू | ४२८६०८ | ७८५२९ |
| ७. | गजराज मजूर | १३२१६६ | १०२७१८ |
| ८. | विठ्ठल मजूर | १००३९९ | ९८७१४ |
| ९. | साईनाथ मजूर | १८१६० | २७०२७ |
| १०. | विठ्ठल मजूर | १७०७६ | ४२५७१ |
| | एकूण | ११७०८९० | ११२०८६० |

आधार - तक

केलेल्या कामाचे मूल्य -

मजूर सहकारी संस्थांना संबधित वर्षामध्ये मिळालेल्या एकूण कामांपैकी जेवढी कामे या संस्थांनी प्रत्यक्ष केलेली आहेत त्या कामांच्या मूल्यांचा निर्देश तक्ता क्रमांक ३.१० मध्ये केलेला आहे.

तक्ता क्रमांक ३.१० वरून असे दिसून आले की कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांनी १९८३-८४ मध्ये २०,२५,५८२ रुपये, १९८४-८५ मध्ये १६,२८,८८५ रुपये, १९८५-८६ मध्ये २७,७३,९८८ रुपये आणि १९८७-८८ मध्ये १६,५३,७०९ रुपये किंमतीची कामे केलेली आहेत.

१९८४-८५ हे वर्ष वगळता १९८३-८४ ते १९८६-८७ या वर्षात मजूर सहकारी संस्थांनी केलेल्या कामांच्या मूल्यात वाढ झालेली आहे. मजूर सहकारी संस्थांनी केलेल्या कामांच्या मूल्यात १९८३-८४ च्या तुलनेने १९८४-८५ या वर्षात १९.५९ टक्क्याने घट, झालेली आहे तर १९८४-८५ च्या तुलनेने १९८५-८६ या वर्षात ७०.३१ टक्क्यानी आणि १९८५-८६ च्या तुलनेने १९८६-८७ या वर्षात ३१.६६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. मात्र १९८६-८७ च्या तुलनेने १९८७-८८ या वर्षात ५४.७२ टक्के इतक्या मोठया प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. ही घट होण्याचे कारण म्हणजे ३ सप्टेंबर १९८७ च्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांच्या वर काही जाचक अटी लादण्यात आल्या.११

११ त्यामुळे मजूर सहकारी संस्थांना या वर्षी कमी कामे मिळाली.

कामे मिळालेल्या मजूरांची संख्या -

कवठे महांकाळ तालुक्यातील ज्या मजूर सहकारी सस्थांचा अभ्यास

| अ.नं. | मजूर सहकारी संस्थे | ८६-८७ | | : | १९८७-८८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गार सद | एकूण | सभासद | बिगार सभासद | एकूण |
| १. | हमाल कामगार सह.सं. | | ९ | १० | - | १० |
| २. | बजरंग मजूर सहकारी जांबापूर | ० | १९९ | २६ | १४० | १६६ |
| ३. | महाळसाकांत मजूर सह. कुर्वी | ० | ७० | १५ | १५ | ३० |
| ४. | यशोदा मजूर सह.संस्थ | ० | ३६ | २२ | १५ | ३७ |
| ५. | लक्ष्मी मजूर सह.संस्था | ५ | ६० | ३९ | १७७ | २१६ |
| ६. | सिध्देश्वर मजूर सहका वाघोली. | ० | १३४८ | ३० | १३० | १६० |
| ७. | गजराज मजूर सहकारी कवठे महांकाळ | ९ | ४८ | २३ | १२ | ३५ |
| ८. | विठ्ठल मजूर सहकारी | ८ | ५१ | १७ | ४ | २१ |
| ९. | साईनाथ मजूर सहकारी लांडगेवाडी. | ० | ८१ | १५ | ५ | २० |
| १०. | विठ्ठल मजूर सहकारी | ० | ८० | १७ | - | १७ |
| | | २ | १९८२ | २१४ | ४९८ | ७१२ |

करण्यात आलेला आहे त्यांनी त्यांना मिळालेल्या कामांच्या पूर्ततेसाठी कामावर आपल्या संस्थेच्या सभासद मजूराबरोबर बिगर सभासद मजूरांनाही घेतलेले दिसून येते. या संस्थांनी कामावर घेतलेल्या एकूण मजूरांमध्ये सभासद मजूर आणि बिगर सभासद मजूर यांचे प्रमाण काय आहे याचे चित्र तक्ता क्रमांक ३.११ वरून स्पष्ट होते.

१९८३-८४ मध्ये ३५० सभासद मजूर व ३१२३ बिगर सभासद मजूर कामावर घेण्यात आलेले होते. म्हणजेच यावर्षी एकूण मजूरांपैकी सभासद मजूरांचे प्रमाण १०.०८ टक्के व बिगर सभासद मजूरांचे प्रमाणे ८९.९२ टक्के होते १९८४-८५ मध्ये २८५ सभासद मजूर व १६१ बिगर सभासद मजूर कामावर घेण्यात आले होते, त्यांचे एकूण मजूरांशी असणारे प्रमाण अनुक्रमे ६३.९० टक्के व ३६.१० टक्के होते. १९८५-८६ मध्ये ३१७ सभासद मजूर आणि १६०९ बिगर सभासद मजूर कामावर होते. त्यांचे एकूण मजूरांशी असणारे प्रमाण अनुक्रमे १६.४६ टक्के व ८३.५४ टक्के होते. १९८६-८७ मध्ये ३०० सभासद मजूर आणि १६८२ बिगर सभासद म्हणजे १५.१४ टक्के सभासद मजूर आणि ८४.८६ टक्के बिगर सभासद मजूर कामावर घेण्यात आलेले होते आणि १९८७-८८ मध्ये कामावर घेण्यात आलेल्या एकूण मजूरापैकी ३०.०६ टक्के म्हणजे २१४ सभासद मजूर व ६९.९४ टक्के म्हणजे ४९८ बिगर सभासद मजूर होते. हे प्रमाण लक्षात घेता असे दिसून येते की १९८४-८५ हे वर्ष वगळता प्रत्येक वर्षी या मजूर सहकारी संस्थांनी आपल्या कामावर घेतलेल्या एकूण मजूरांपैकी सभासद मजूरापेक्षा बिगर सभासद मजूरांचे प्रमाण अधिक आहे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १९ एप्रिल १९८५ रोजी काढलेल्या परिपत्रकात मजूर सहकारी संस्थांनी त्यांच्या कडील कामावर एकूण मजूरापैकी २५ टक्यापेक्षा अधिक बिगर सभासद मजूर कामावर घेऊ नयेत असे नमूद केले असतानाही या संस्थांनी कामाच्या पूर्ततेसाठी मोठया प्रमाणात बिगर सभासद मजूर कामावर घेतलेले दिसून येतात.

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मजूरांना दिलेली मजुरी -

तक्ता क्रमांक ३.१२ वरुन मजूर सहकारी संस्थांनी १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीत कामावर घेतलेल्या सभासद मजूरांना व बिगर सभासद मजूरांना किती मजुरी दिलेली आहे हे लक्षात येते. १९८३ -८४ मध्ये दिलेल्या एकूण मजूरी [१५,२६,८१५ रु.] पैकी ४५.०५ टक्के [६,८७,८४३ रु.] मजूरी सभासद मजूरांना व ५४.९५ टक्के [८,३८,९७२ रु.] मजुरी बिगर सभासद मजूरांना दिलेली होती. १९८४-८५ मधील एकूण मजुरी [६,६२,४४६ रु.] पैकी ६८.५३ टक्के [४,५४,००२ रु.] मजुरी सभासद मजूरांना व ३१.४७ टक्के [२,०८,४४४ रु.] मजुरी बिगर सभासद मजूरांना दिली होती. १९८५-८६ मध्ये एकूण मजुरी [१७,०२,८९२ रु.] पैकी ३७.१३ टक्के [६,३२,३३८ रु.] मजुरी सभासद मजूरांना व ६२.८७ टक्के [१०,७०,५५४ रु.] मजुरी बिगर सभासद मजुरांना देण्यात आली होती. तर १९८६-८७ मधील एकूण मजुरी [२४,७७,४८३ रु.] पैकी ४४.२१ टक्के [१०,९५,२११ रु.] मजुरी सभासद मजूरांना व ५५.७९ टक्के [१३,८२,२७२ रु.] मजुरी बिगर सभासद मजूरांना देण्यात आली होती. आणि १९८७-८८ मध्ये देण्यात आलेल्या एकूण मजुरी [१४,०९,१५७ रु.] पैकी ३४.८८ टक्के [४,९१,५२२ रु.] मजुरी सभासद मजूरांना व ६५.१२ टक्के [९,१७,६३५ रु.] मजुरी बिगर सभासद मजुरांना देण्यात आली आहे.

यावरुन असे दिसून येते की १९८४-८५ या वर्षात कामावरील एकूण मजूरांत सभासद मजूरांचे प्रमाण अधिक असल्याने यावर्षी सभासद मजूरांना बिगर सभासद मजूरापेक्षा अधिक मजुरी मिळाली आहे. परंतु इतर वर्षात कामावरील एकूण मजूरांत बिगर सभासद मजूरांचे प्रमाण अधिक असल्याने बिगर सभासद

मजूरांनाच अधिक मजुरी मिळालेली आहे. म्हणजेच या संस्थांच्या सभासद मजूरांच्या पेक्षा बिगर सभासद मजूरांचाच फायदा झाला आहे.

१९८४-८५ व १९८७-८८ या वर्षात मागील वर्षाच्या तुलनेने देण्यात आलेली एकूण मजुरी कमी झाल्याचे दिसते कारण यावर्षी या संस्थांनी केलेल्या कामाचे मूल्य कमी झालेले आहे.

## मजूरांना मिळालेल्या कामाचे सरासरी दिवस -

कवठे महांकाळ तालुक्यातील ज्या मजूर सहकारी संस्थांचा अभ्यास करण्यात आलेला आहे त्यांनी कामावर घेतलेल्या सभासद मजूरांना आणि बिगर सभासद मजूरांना वार्षिक सरासरी किती दिवस काम उपलब्ध करून दिले हे पाहण्यासाठी खालील सूत्राचा वापर केलेला आहे.

**सूत्र**

कामावरील मजूरांची संख्या × मजुरीचा दर = कामावरील मजूरांची एक दिवसाची मजुरी

$$\frac{\text{कामावरील मजूरांना दिलेली वर्षातील एकूण मजुरी}}{\text{कामावरील मजूरांची एक दिवसाची मजुरी}} = \text{मजूरांना मिळालेल्या कामाचे वार्षिक सरासरी दिवस}$$

या मजूर सहकारी संस्थांनी कामावरील सर्व मजूरांना १९८३-८४ ते १९८७-८८ या प्रत्येक वर्षी दिलेला दिवसाचा सरासरी मजुरी दर लक्षात घेता असे दिसून आले की १९८३-८४ मध्ये सरासरी मजुरीचा दर १० रू.,१९८४-८५ मध्ये

१२ रू., १९८५-८६ मध्ये १५ रू., १९८६-८७ मध्ये १८ रू. आणि १९८७-८८ मध्ये २० रू. इतका होता. हा मजुरीचा दर आणि तक्ता क्रमांक ३.११ मधील सभासद मजूर आणि बिगर सभासद मजूरांची एकूण संख्या व तक्ता क्रमांक ३.१२ मधील मजूरांना देण्यात आलेली १९८३-८४ ते १९८७-८८ या प्रत्येक वर्षातील एकूण मजुरी लक्षात घेऊन वरील सूत्राच्या साहयाने १९८३-८४ ते १९८७-८८ या प्रत्येक वर्षात सभासद मजूर आणि बिगर सभासद मजूर यांना वार्षिक सरासरी किती दिवस काम मिळाले हे तक्ता क्रमांक ३.१३ दर्शविण्यात आले आहे.

## तक्ता क्रमांक ३.१३

## मजूरांना मिळालेल्या कामाचे वार्षिक सरासरी दिवस

| वर्ष | सभासद मजूरांना मिळालेल्या कामाचे वार्षिक सरासरी दिवस | बिगर सभासद मजूरांना मिळालेल्या कामाचे वार्षिक सरासरी दिवस. |
|---|---|---|
| १९८३-८४ | १९७ | २७ |
| १९८४-८५ | १३३ | १०८ |
| १९८५-८६ | १३३ | ४४ |
| १९८६-८७ | २०३ | ४६ |
| १९८७-८८ | ११५ | ९२ |

तक्ता क्रमांक ३.१३ मधील आकडेवारी वरून असे दिसते की १९८३-८४ ते १९८७-८८ या वर्षात मजूर सहकारी संस्थांच्या कडून बिगर सभासद मजूरांच्या पेक्षा सभासद मजूरांना अधिक दिवस काम मिळालेले आहे. परंतु या मजूर सहकारी संस्था आपल्या सभासद मजूरांना वर्षातील संपूर्ण दिवस किंवा जास्तीत जास्त दिवस काम उपलब्ध करून देऊ शकलेल्या नाहीत.

मजूर सहकारी संस्थांना मिळालेले उत्पन्न -

मजूर सहकारी संस्थांना मिळणारा कंत्राटी [व्यापारी] नफा, बँक व्याज, लाभांश इ. घटकांचा समावेश मजूर सहकारी संस्थांच्या उत्पन्नात केला जातो.

तक्ता क्रमांक ३.१४ मध्ये कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांना १९८३-८४ ते १९८७-८८ या काळात मिळालेले उत्पन्न दर्शविलेले आहे. १९८३-८४ मध्ये मजूर सहकारी संस्थांचे ७८,५५३ रु.उत्पन्न होते त्यामध्ये १९८४-८५ मध्ये १२.२७ टक्केने घट होऊन मजूर सहकारी संस्थांचे उत्पन्न ६८,९१३ रु. झाले. यामध्ये १९८५-८६ मध्ये ५०.८७ टक्केने वाढ होऊन मजूर सहकारी संस्थांचे उत्पन्न १,०३,९६९ रु. झाले. यामध्ये १९८६-८७ मध्ये २९.३९ टक्केने वाढ होऊन १,३४,४४० रु. मजूर सहकारी संस्थांचे उत्पन्न झाले. मात्र यामध्ये १९८७-८८ मध्ये ४७.१५ टक्केने घट होऊन त्यांचे उत्पन्न ७१,०५४ रु. झाले.

१९८४-८५ व १९८७-८८ या वर्षी मजूर सहकारी संस्थांच्या उत्पन्नात घट होण्याचे कारण म्हणजे या दोन्ही वर्षात मजूर सहकारी संस्थांनी केलेल्या कामांच्या किंमती कमी असल्याने त्यांना कंत्राटी [व्यापारी] नफा कमी झाला आहे.

## व्यवस्थापकीय खर्च -

मजूर सहकारी संस्थांच्या व्यवस्थापकीय खर्चाची विभागणी दोन भागात केली जाते. १. सचिवाचा पगार, भत्ता, प्रवास खर्च. २. इतर खर्च-या मध्ये सुपरव्हिजन फी, बँक कमिशन, स्टेशनरी खर्च, विमा, निविदा अर्ज, हिशोब तपासणी फी, हत्यारे अवजारांची झीज, किरकोळ खर्च इ. बाबींचा समावेश होतो.

तक्ता क्रमांक ३.१५ वर असे दिसून येते की या संस्थांनी १९८३-८४ मध्ये केलेल्या व्यवस्थापकीय खर्चापैकी २७.९५ टक्के खर्च पगार भत्ता आणि ७२.०५ टक्के खर्च इतर बाबीवर झालेला आहे. १९८४-८५ मध्ये एकूण व्यवस्थापकीय खर्चापैकी ३७.७२ टक्के खर्च पगार, भत्ता आणि ६२.२८ टक्के खर्च इतर बाबीवर झालेला आहे. तर १९८५-८६ मध्ये पगार भत्यावर २४.७५ टक्के आणि ७५.२५ टक्के इतर बाबीवर खर्च झाला आहे "१९८६-८७ साली २४.४३ टक्के पगार भत्ते यांवर आणि ७५.५७ टक्के इतर बाबींवर खर्च झाला आहे. आणि १९८७-८८ मध्ये एकूण व्यवस्थापकीय खर्चापैकी २५.५४ टक्के पगार भत्यावर व ७४.४६ टक्के इतर बाबीवर खर्च झालेला दिसून येतो.

यावरून असे म्हणता येईल की मजूर सहकारी संस्थांच्या व्यवस्थापकीय खर्चापैकी जवळ जवळ १/४ खर्च पगार-भत्यावर तर ३/४ खर्च इतर बाबीवर केला जात आहे.

## मजूर सहकारी संस्थांचा नफा-तोटा-

तक्ता क्रमांक ३.१६ मध्ये कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांना १९८३-८४ ते १९८७-८८ या काळात झालेला निव्वळ नफा-तोटा लक्षात

तक्ता क्रमांक ३·१४

मजूर सहकारी संस्थांना मिळालेले उत्पन्न (रुपयांत)

| अ·नं· | मजूर सहकारी संस्थेचे नांव | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७- |
|---|---|---|---|---|---|---|
| १· | हमाल कामगार सहकारी संस्था लि·,कवठे महांकाळ | ४,४७३ | ३,३९६ | ४,१७८ | १०,२०७ | ६,३ |
| २· | बजरंग मजूर सहकारी संस्था लि·,जाखापूर | ६,२९३ | १,१८० | २,१२० | ३,७७२ | ८,१ |
| ३· | म्हाळसाकांत मजूर सहकारी संस्था लि·, कुची | १४,५३९ | ४ | १३,०८७ | ९,१५७ | २,६ |
| ४· | यशोदा मजूर सहकारी संस्था लि·,घाटनांद्रे | ७,०५५ | ६,३७९ | २०,८९३ | ३०,६४७ | ३२,३ |
| ५· | लक्ष्मी मजूर सहकारी संस्था लि·,कवठे महांकाळ | ९,४५७ | २,२९५ | ५,५४८ | ७,३२० | ८,० |
| ६· | सिध्देश्वर मजूर सहकारी संस्था लि·,वाघोली | ६,९०२ | ३२,६१० | १२,२६४ | १३,९७२ | |
| ७· | गजराज मजूर सहकारी संस्था लि·,कवठे महांकाळ | १५,०३९ | ६,७१९ | १५,९०० | १७,७१६ | ९,३ |
| ८· | विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि·,लंगरपेठ | ९,४९१ | ५,१०८ | ५,८८८ | ११,९०० | १,७ |
| ९· | साईनाथ मजूर सहकारी संस्था लि·,लांडगेवाडी | ५,३०० | ५,३१४ | १०,०८१ | १३,०५७ | ९ |
| १०· | विठ्ठल मजूर सहकारी संस्था लि·, बनेवाडी | ४ | ५,९०८ | १४,०१० | १६,६९२ | १,५ |
| | एकूण ·· | ७८,५५३ | ६८,९१३ | १,०३,९६९ | १,३४,४४० | ७१,० |

आधार : तक्ता क्रमांक ३·३ प्रमाणे·

तक्ता क्रमांक ३·१६

मजूर सहकारी संस्थांना झालेला नफा / तोटा ( रुपयांत )

| र सहकारी संस्थेचे नांव | १९८३-८४ |  | १९८४-८५ |  | १९८५-८६ |  | १९८६-८७ |  | १९८७-८८ |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  | नफा | तोटा | नफा | तोटा | नफा | तोटा | नफा | तोटा | नफा | तोटा |
| कामगार मजूर सह·संस्था लि·क·महांकाळ | २२०६ | -- | २५८४ | - | ३४७२ | -- | ७७१३ | -- | ४९५८ | -- |
| मजूर सह·संस्था लि·,जाखापूर | ३३३३ | -- | -- | ५६३ | ७९३ | -- | १२०२ | -- | ५०३३ | -- |
| ाकात मजूर सह·संस्था लि·,कुची | १०८७३ | -- | -- | १६१० | ८७१२ | -- | ४२५४ | -- | ४०६ | -- |
| मजूर सह·संस्था लि·,घाटनांद्रे | २१०४ | -- | २०१९ | -- | ११६६१ | -- | १६०४३ | -- | १८८६४ | -- |
| मजूर सह·संस्था लि·,कवठे महांकाळ | ४१६८ | -- | -- | २९९० | १२७६ | -- | २२४६ | -- | -- | १३९० |
| वर मजूर सह·संस्था लि·,वाघोली | १७५ | -- | २७९६९ | -- | २३९२ | -- | ५५४५ | -- | -- | १५७१४ |
| मजूर सह·संस्था लि·,कवठे महांकाळ | ९३०६ | -- | ११२७ | -- | ५६१२ | -- | ११००९ | -- | ४४११ | -- |
| मजूर सह·संस्था लि·,लंगरपेठ | ४०६४ | -- | ५९२ | -- | ५३६ | -- | ५०९७ | -- | -- | १५८६ |
| थ मजूर सह·संस्था लि·,लांडगेवाडी | २११२ | -- | २४७५ | -- | ६५४७ | -- | ६२८१ | -- | -- | १६१८ |
| मजूर सह·संस्था लि·, बनेवाडी | -- | ६५१ | २६९२ | -- | १११६ | -- | ४३५९ | -- | -- | २१२० |
| · | ३८३४१ | ६५१ | ३९४५८ | ५१६३ | ४२११७ | -- | ६४३६९ | -- | ३३६७२ | २२४२८ |

आधार : तक्ता क्रमांक ३·३· प्रमाणे·

घेतलेला आहे.

१९८३-८४ मध्ये या दहा मजूर सहकारी संस्थांपैकी फक्त एक मजूर सहकारी संस्था तोटयात होती व तिला ६५१ रु. तोटा झालेला होता. व इतर ९ मजूर सहकारी संस्थांना ३८,३४१रु. नफा झालेला होता. १९८४-८५ मध्ये ३ मजूर सहकारी संस्था तोटयात होत्या त्यांना ५१६३ रु. या तोटा झालेला होता तर इतर ७ मजूर सहकारी संस्थांना ३९,४५८ रु. या नफा झालेला होता १९८५-८६ व १९८६-८७ मध्ये एकही मजूर सहकारी संस्था तोटयात नव्हती. १९८५-८६ मध्ये ४२,११७ रु. व १९८६-८७ मध्ये ६४,३६९ रु. नफा त्यांना झाला होता. तर १९८७-८८ साली या १० मजूर सहकारी संस्थांपैकी ५ मजूर सहकारी संस्था तोटयात होत्या. त्यांना २२,४२८ रु. या तोटा झाला होता व ५ मजूर सहकारी संस्था नफ्यात होत्या. त्यांना ३३,६७२ रु. या नफा झालेला होता.

## मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण -

मजूर सहकारी संस्थांच्या अ,ब आणि क या वर्गवारीनुसार मजुर सहकारी संस्थांना वेगवेगळ्या सवलती देण्यात येतात. कवठे महांकाळ तालुक्यात १९८७-८८ अखेर १६ मजूर सहकारी संस्था अस्तित्वात होत्या. या संस्थांची वर्गवारी लक्षात घेता असे दिसून आले की या एकूण १६ मजूर सहकारी संस्थांपैकी ७ मजूर सहकारी संस्थांचा "अ" वर्गात, ६ मजूर सहकारी संस्थांच्या "ब" वर्गात समावेश होता, "क" वर्गात या वर्षी एकही मजूर सहकारी संस्था नव्हती बाकीच्या ३ मजूर सहकारी संस्था या अवर्गीकृत होत्या. म्हणजेच १९८७-८८ मध्ये कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी ४३.७५ टक्के मजूर सहकारी संस्था "अ" वर्गात, ३७.५० टक्के मजूर सहकारी संस्था "ब" वर्गात होत्या आणि १८.७५ टक्के मजूर

सहकारी संस्था अवर्गीकृत होत्या.

[ आधार - अभ्यासासाठी निवडलेल्या कवठे महांकाळ तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांचे १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीतील वार्षिक अहवाल. ]

## प्रकरण चौथे

तज्ञ व्यक्ती व समित्यांनी मजूर सहकारी संस्थांच्या सांगितलेल्या समस्या व त्यावरील उपाय आणि केलेल्या शिफारशी –

४.१ राजाभाऊ कुसाळकर [अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन, १९८५] यानी महाराष्ट्रातील मजूर सहकारी चळवळीचा अभ्यास करून मजूर सहकारी चळवळी पुढील समस्या व त्यावरील उपाय खालील प्रमाणे सांगितलेले आहेत.

१. शासनाचे मजूर सहकारी संस्थांना द्यावयाचे सवलतीचे आदेश सार्वजनिक बांधकाम खात्याने काढल्यानंतर ते शासनाच्या इतर काम देणा–या खात्यांनी पाळण्याबाबत –

१९४८ पासून आजतागायत शासनातर्फे मजूर सहकारी संस्थांना द्यावयाच्या सवलतीचे आदेश सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत काढले जातात. १९६० पासून पाटबंधारे खाते स्वतंत्र झाले व १९६२ साली जिल्हा परिषदांची निर्मिती झाली. असे अनुभवास येते की, सार्वजनिक बांधकाम खात्याने काढलेल्या आदेशांचे इतर शासनाची कामे देणारी खाती [मुख्यत्वे करून ग्रामीण विकास खाते] पूर्णत्वाने पालन करीत नाहीत. त्याबाबत त्यांना वारंवार लिहावे लागते. वस्तुत: सार्वजनिक बांधकाम खात्याने शासनाचे धोरणाप्रमाणे आदेश काढले तर इतर काम देणा–या खात्यांना ते स्वाभाविकपणे बंधनकारक आहेत.

कामे देणारी खाती मजूर सहकारी संस्थांच्या कक्षेतील [दोन लाख रुपये किंमतीची कामे] कामांपैकी फक्त १५ ते २० टक्के कामे मजूर सहकारी

संस्थांना देतात. राहिलेली ८० ते ८५ टक्के खाजगी कंत्राटदारांना अगर परस्पर मजूर सहकारी संस्थांना शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन देतात. सार्वजनिक बांधकाम खात्याने मजूर सहकारी संस्थांना भांडवल कमी पडू नये म्हणून सार्वजनीक हिशोब समितीच्या शिफारशीनुसार, २० टक्के अग्रीम रक्कम कामाचे आदेश देताना द्यावी यासाठी दिनांक १-३-१९७७ ला आदेश काढले ही सवलत अजून चालू आहे परंतु ग्रामविकास खात्याने सदर सवलत १-३-१९८१ पासून काढून घेतली आहे. हा विषय दिनांक २७-९-१९८३ रोजी मंत्रालयात झालेल्या पहिल्या सभेत उपस्थित केला होता. त्यावर सार्वजनिक बांधकाम खात्याने त्यांच्या कक्षेतील अधिका-यांनाच फक्त दिनांक ३१-१०-१९८३ परिपत्रक काढून कळविले. बाकी इतर खात्यांनी [पाटबंधारे,ग्रामविकास, परिसर अभियांत्रिकी] याची दखल घेतली नाही.

वरील अडचणीवर खालील कारवाई केल्यास सुसूत्रता येईल असे वाटते -

अ. सार्वजनिक बांधकाम खात्याने काढलेल्या सवलतीचे आदेश इतर काम देणा-या खात्यांनी [पाटबंधारे, ग्रामविकास, परिसर अभियांत्रिकी, शेतकी, महसूल, दुग्धविकास इ. ] पाळले पाहिजेत,नाहीतर सदर सवलतींचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने काढावेत.शासनाचे काम देणा-या अधिका-यांनी कामे जर दिली नाहीत तर त्यांचेवर कारवाई व्हावी.

ब. दरवर्षी ज्यावेळी प्रत्येक कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयाची वार्षिक तपासणी विहीत महालेखापाला मार्फत होईल त्यावेळी तपासणी अहवालामध्ये खालील गोष्टींचा उल्लेख करावा -

१. संपूर्ण वर्षात [ एप्रिल ते मार्च ] २ लाख रुपया पर्यंतची

किती कामे उपलब्ध झाली- कामांची संख्या व किंमत -

२. वरील पैकी किती कामे मजूर सहकारी संस्थांना जिल्हा काम वाटप समितीमार्फत देण्यात आली ? कामांची संख्या व किंमत -

३. वरील पैकी किती कामे परस्पर खाजगी ठेकेदारांना अगर परस्पर मजूर सहकारी संस्थांना देण्यात आली ? कामांची संख्या व किंमत -

४. वरील ३ मधील परस्पर दिलेल्या कामांच्या बाबतीत परिच्छेद ६ [ III ] शासन निर्णय क्रमांक एल.सी.एस./१०७७/५५९३३/का.२७, दिनांक ३० मार्च १९७९ प्रमाणे कारवाई केली आहे काय ? किती प्रमाणात केली व किती प्रमाणात केली नाही ? -

सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी जा.क्रमांक एल.ए.बी.१०८५/सी.आर./४५/ इमारती २ दिनांक २९ जुलै १९८५ रोजी परिपत्रक काढले आहे. हे परिपत्रक अत्यंत मोलाचे व महत्वाचे आहे, त्यात असे म्हटले आहे की, मुख्य अभियंता हे कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयाची तपासणी करताना एक तपासणी नमुना वापरतात. मजूर सहकारी संस्थांना २ लाख रुपये किंमती पर्यंतची सर्व कामे देण्यात आली आहेत किंवा कसे हे पहाण्यासाठी त्या नमुन्यात या बाबत एक परिच्छेद अंतर्भूत करण्यात यावा व त्यानुसार आर्थिक वर्षामध्ये किती कामे निर्माण झाली व त्यापैकी मजूर सहकारी संस्थांना किती कामे दिली, हे मुख्य अभियंत्यांनी तपासावे व त्यानुसार कार्यवाही करावी.

वरील परिपत्रकांचा अत्यंत चांगला उपयोग होऊन मजूर संस्थांना मोठया संख्येने कामे मिळतील अशी खात्री वाटते.

२. मजूरांची संख्या -

कृषि व सहकार खाते यांनी दिनांक २८ फेब्रुवारी १९७५ रोजी काढलेल्या परिपत्रकाप्रमाणे "मजूर" याची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

" वेतनासाठी शारीरिक काम करणा-या व्यक्तीस मजूर असे म्हणता येईल. ते वेतन कामानुसार असेल किंवा कालानुसार असेल. उत्पन्नाचे मुख्य साधन वर्षभर हे वेतनच असते किंवा शेतमजूरांच्या बाबतीत [ यात छोटे व सीमांत शेतकरीही येतात ] विशिष्ट ऋतूत ते उत्पन्नाचे मुख्य साधन असते"

मजूर सहकारी संस्था जेंव्हा एखादे काम हाती घेते तेंव्हा कामाची आखणी करावी लागते कोणता माल किती व केंव्हा लागेल याचे योग्य नियोजन तिला करावे लागते. वरील व्याख्ये-प्रमाणे जो फक्त शारीरिक काम करतो तोच मजूर सहकारी संस्थेचा सभासद होऊ शकतो. तथापि शारीरिक काम करणारे सभासद कालांतराने पूर्वीसारखे प्रत्यक्ष काम करु शकत नाहीत परंतु त्यांच्या अनुभवाचा फायदा कामावरील देखरेखीसाठी करण्यात येतो. तसेच काम देणा-या खात्याकडे मजूर सहकारी संस्थेची प्रलंबित बिले तयार करणे वगैरे कामासाठी कामाची माहिती असलेल्या सभासदांची जरुरी असते. अशा परिस्थितीत शासनाने पूर्वी [दि. २८-२-१९७५] केलेल्या व्याख्येत खालीलप्रमाणे बदल करणे जरुरीचे व व्यवहारिक झाले आहे.

" कामानुसार किंवा कालानुसार दिल्या जाणा-या वेतनासाठी शारीरिक काम करणा-या व्यक्तीला मजूर असे म्हणता येईल. तथापि, एखादा तंत्रज्ञ किंवा समाज सेवक, श्रमिकांसाठी किंवा त्यांच्या संस्थांच्या विकासासाठी मुख्यत्वे आपल्या सेवा समर्पित करीत असेल तर सदस्यत्वासाठी तो पात्र ठरेल. नोंदणी केलेला एखादा कंत्राटदार किंवा ही संस्था ज्या प्रकारचे काम [व्यवसाय] करीत आहे. तसलेच काम करणारी व्यक्ती सभासदत्वासाठी अपात्र ठरेल. "

३. मजूर सहकारी संस्थांची राज्य पातळी वरील समन्वय समिती -

सदर समितीची स्थापना शासन निर्णय क्रमांक कृषि व सहकार खाते एलसीएस १०७१/१७३२५/सी-२दिनांक ३-१-१९७५ ने झाली व सदर समितीची पुनर्रचना कृषि व सहकार खाते शासन निर्णय क्रमांक एलसीएस १०७९/ ५५८/[५१]/९-सी, दिनांक १०-९-१९७९ ने झाली. वेळोवेळी विनंती केल्यावर या समितीची दिनांक २७-९-१९८३ रोजी त्यावेळचे सहकार मंत्री अभयसिंहराजे भोसले यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात पहिली सभा झाली. या सभेच्या कार्यवृत्तांतानुसार कारवाई पूर्ण झाली नाही. तसेच या सभेमध्ये असेही ठरले होते की, सदर समितीच्या सभा वर्षामधून दोनदा व्हाव्यात. परंतु त्यांचे परिपालन होत नाही. याबद्दल कारवाई होणे जरुरीचे आहे. या सभा वेळेवर होणे अत्यंत अगत्याचे आहे. कारण या सभेत धोरणात्मक निर्णय घेण्यात येतात.

४. मजूर सहकारी संस्थांच्या अडचणी सोडविणे बाबत शासनाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर नेमलेल्या उपसमितीबाबत-

सदर समितीची स्थापना शा.क्रमांक एलसीएस/१००९/ २८०४/३२५/९- स दिनांक १३ जून १९७९ ने झाली आहे. या समितीच्या सभा निदान तीन महिन्यातून एकदा व्हाव्यात असे आदेश असताना त्या सभा वेळेवर होत नाहीत. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून, जिल्हयाचे उपनिबंधक हे सभासद सचिव आहेत. या समितीच्या सभा बहुतांश जिल्हयातून घेतल्या जात नाहीत व ज्या काही जिल्हयात घेतल्या जातात त्यांचे प्रमाण फारच कमी आहे. म्हणून हा विषय दिनांक २७-९-१९८३ च्या सभेत चर्चिला गेला होता. परंतू त्यानंतर याबाबत काहीच कारवाई झाली नाही. याबाबत शासनाने त्वरित कारवाई करणे जरुरीचे आहे.

५. मजूर सहकारी संस्थांचे भाग भांडवल व त्यात शासनाचा असलेला सहभाग -

मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या भाग भांडवलाच्या चौपट भाग-भांडवल शासनाकडून कर्ज रुपाने मिळते, परंतु शासनाच्या भागभांडवलाची मर्यादा जास्तीत जास्त ३००० रुपये आहे. एवढया थोडया भांडवलावर मजूर सहकारी संस्थांना काम करणे शक्य होत नाही. तसेच मजूर सहकारी संस्थांना त्यांचे भांडवल व स्वत:ची पुंजी याचे तिप्पट [१:३ या प्रमाणात] जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका रोखकर्ज मंजूर करीत असत. परंतु नाबार्डच्या परिपत्रकाप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका असे कर्ज आता फक्त १:१ या प्रमाणात मंजूर करतात व जादा हवे असेल तर शासनाची हमी लागते. या बाबतीत खालील व्यवस्था झाल्यास मजूर सहकारी संस्थांना ती अत्यंत उपयोगी ठरेल.

अ. शासनाने भाग भांडवलाचे प्रमाण १:४ आहे ते १:९ करणे आवश्यक आहे. व त्याची मर्यादा ९०००/- रुपयापर्यंत वाढविणे जरूर आहे.

ब. पूर्वी मध्यवर्ती बँका मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या भांडवलाच्या व स्वत:च्या पुंजीच्या तिप्पट रोखकर्ज मंजूर करीत असत, परंतु नाबार्डच्या परिपत्रकानुसार हे प्रमाण १:१ असे केले आहे. ते नाबार्डशी चर्चा करुन पूर्वीप्रमाणे सरकारी हमीशिवाय १:३ हे ठेवावे.

वरील दोन्ही गोष्टींची पूर्तता झाल्यास मजूर संस्थांना कामाचे बाबतीत वेगाने प्रगती करता येईल. हा विषय दिनांक २७-९-१९८३ च्या सभेत घेतला होता परंतु अजून पूर्तता झालेली नाही.

## ६. मजूर सहकारी संस्थांचे नोंदणी बाबत -

इमारतीच्या कामामध्ये मालाची किंमत ८० टक्के असते व मजुरीची किंमत २० टक्के असते, तसेच रस्त्याच्या, कॅनॉलच्या भरावयाच्या खुदाईच्या, खडी व मुरुम जमा करण्याच्या कामामध्ये मालाची किंमत २५ टक्के असते व मजुरीची किंमत ७५ टक्के असते. मजूर सहकारी संस्थांना दोन्ही त-हेची कामे करावी लागतात. ५० मजूर असलेल्या मजूर सहकारी संस्थेस मजुरीपोटी मेहनताना खालीलप्रमाणे द्यावा लागतो.

उदाहरण - * मजूर सभासदांची संख्या - ५०

* वर्षातून कमीत कमी २७० दिवस कामे मजूर सभासदांना द्यावी लागतात.
* सर्वसाधारणपणे सरासरी रोजी २५ रुपये मजुरी दिली तर एकूण वार्षिक मेहनताना खालीलप्रमाणे होईल -

५० x २७० x २५ = ३,३७,५००/- किंवा ३,४०,०००/- रुपये.

अ. जर इमारतीचे काम मजूर सहकारी संस्थांनी केले तर त्यात २० टक्के मजुरीची किंमत असते. व ८० टक्के मालाची किंमत असते व ३,४०,०००/- रुपयाची मजुरी देण्यासाठी एकूण खाली दर्शविल्याप्रमाणे १७ लाख रुपयाची कामे द्यावी लागतील.

$$\frac{3,40,000}{20} \times 100 = 17,00,000 \text{ रुपये}$$

ब. जर रस्त्याचे, कॅनॉलच्या, भरावाचे, खुदाईचे, खडी व मुरुम जमा करण्याचे काम केले तर त्यात ७५ टक्के मजुरीची किंमत असते व मालाची [सुरुंगाची दारू वगैरे] २५ टक्के असते व ३,४०,००० रुपये मजुरी देण्यासाठी एकूण ४,५३,००० रुपयाची कामे द्यावी लागतील.

वर म्हटल्याप्रमाणे मजूर सहकारी संस्था दोन्ही त-हेच्या [ अ व ब ] कामे करतात म्हणून त्यांना एकूण वार्षिक अ + ब किंवा $\frac{१७ + ४.५३}{२}$ = १०.७६ लाख रू. किंवा ११ लाख रूपयांच्या कामाची जरूरी असते.

दिनांक ३० जून १९८४ अखेर एकूण ४६६३ एवढया सहकारी मजूर संस्थांची नोंदणी झाली. [महाराष्ट्रात ●] मजूर सहकारी संस्थांची नोंदणी कामाची उपलब्धता न पाहता शासनाच्या नोंदणी अधिका-यांनी बेजबाबदारपणे केली. ४६६३ मजूर सहकारी संस्थांना एकूण ५१२ कोटी रूपयांच्या कामाची जरूरी असता केवळ ५१ कोटी रूपयांच्या आसपास कामे मिळाली व पर्यायाने ब-याचशा मजूर सहकारी संस्था कामाविना राहून मोडकळीस आल्या. ही बाब सहकार आयुक्त व शासन यांचे नजरेस आणल्यानंतर सहकार आयुक्तानी दिनांक १२-११-१९८२ रोजी १७ जिल्हयांत नवीन संस्थांच्या नोंदणीस बंदी घातली दिनांक २७-९-१९८३ च्या सभेत यावर चर्चा झाली व नवीन मजूर सहकारी संस्थांच्या नोंदणीसाठी राज्यातील सर्व जिल्हयांत बंदी घातली, १९७८ ते १९८४ या सहा वर्षात मजूर सहकारी संस्थेत एकूण २८०१ संस्थांची भर पडली म्हणजे १५० टक्क्याची वाढ झाली, ही जी अचानक वाढ झाली आहे. ती मजूर सहकारी चळवळीला घातक आहे. या वाढीत या नात्या मार्गाने ठेकेदार घुसले आहेत. व त्यांत संबधित लोकांच्या आप्तेष्टांच्या व मित्रांच्या मजूर सहकारी संस्था आहेत. याची साधार भीती वाटते. कारण त्यामुळे मजूर सहकारी चळवळीस नामुष्की पत्करावी लागत आहे. बंदी असून सुध्दा नवीन मजूर सहकारी संस्था नोंदणी अधिका-यांनी कोणाच्या तरी दबावाखाली नोंदविल्या आहेत.

या सर्व गोष्टींचा विचार करून सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १९-४-१९८५ रोजी एक परिपत्रक काढले व नवीन संस्था नोंदणी करिता धोरणात्मक आदेश दिले. हे धोरणात्मक आदेश राबविणेबाबत व्यवहारिक अडचणी असल्यामुळे त्यावेळचे सहकारमंत्री नरेंद्रजी

तिडके यांना राज्य फेडरेशनच्या वतीने दिनांक २३-५-१९८५ रोजी एक निवेदन दिले. त्यानुसार सहकार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली काही जिल्हा उपनिबंधक व काही विभागीय सह निबंधक, काही जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष व राज्य फेडरेशनचे संचालक यांची दिनांक १७-६-१९८५ रोजी राज्य फेडरेशनच्या कार्यालयात एक सभा झाली व दिनांक १९-४-१९८५ च्या परिपत्रकाबाबत ऊहापोह झाला. परंतु काही जिल्हा फेडरेशनच्या अध्यक्षांचे व राज्य फेडरेशनच्या काही संचालकांचे समाधान झाले नाही, म्हणून दिनांक २-७-१९८५ रोजी सर्व जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष व संचालक यांची आणखी एक सभा झाली. या सभेस अतिरिक्त आयुक्त हेही हजर होते. या सभेनंतर सर्व अडचणींचा विचार करून सहकारी आयुक्तांनी दिनांक ३-७-१९८५ रोजी एक परिपत्रक काढून सुरुवातीस प्रत्येक जिल्ह्यात प्रयोगा दाखल फक्त ५ मजूर सहकारी संस्थांना हे परिपत्रक [सुधारित] लागू करून काय अनुभव येतो हे बघून काय बदल करावयाचे हे ठरविण्यात येईल असे कळविले.

७. काम वाटप समिती -

जिल्हा फेडरेशनच्या उपविधी प्रमाणे, जिल्हा फेडरेशनने आपल्या संलग्न मजूर सहकारी संस्थांना काम वाटपाचे काम करावयाचे व ती कामे व्यवस्थित होतात किंवा कसे यावर लक्ष ठेवून ती कामे पुरी करावयाची असतात. दिनांक ९-११-१९७३ रोजी अध्यक्ष, जिल्हा मजूर फेडरेशन यांच्या अध्यक्षतेखाली काम वाटपासाठी एक समिती नेमण्यात आली व दिनांक २९-१०-१९७६ साली या समितीची पुनर्रचना करण्यात आली. ही समितीसुध्दा अध्यक्ष जिल्हा फेडरेशन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेली होती दिनांक ३-७-१९७९ रोजी अचानक शासनाने या समितीची पुनर्रचना करून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना या समितीचे अध्यक्ष केले. व मजूर, उपअभियंता यांना सभासद सचिव केले व या चळवळीचे सरकारीकरण केले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

या समितीचा अनुभव चांगला नाही. कामाच्या वाटणीत फार गैरप्रकार सुरू आहेत व पुष्कळशा संस्थांना कामेच मिळत नाहीत. याबद्दल अनेक तक्रारी करून सुध्दा शासनाकडून त्याचे निरसन झाले नाही. जिल्हा उपनिबंधक काहीही म्हणत असले तरी या चळवळीकडे त्यांना लक्ष देण्यास वेळ मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.

मजूर सहकारी संस्थांच्या काम वाटपाबाबतच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने १३ जून १९७९ रोजी एक उपसमिती नेमली. सदरच्या उपसमितीचे सदस्य सचिव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे आहेत. सदर समितीच्या सभा दर तीन महिन्यांनी घेण्यात याव्यात अशा सूचना दिल्या आहेत. परंतु बहुतांश जिल्हयातून वेळेवर अशा सभा झालेल्या नाहीत. तर काही जिल्हयात अजून एकही सभा झाली नाही, यावरून जिल्हा उपनिबंधक याबाबत किती उदासीनआहेत हे दिसून येते. अशा परिस्थितीत काम वाटपाची काय हालत असेल याची कल्पना येईल.

ही समस्या दिनांक २७-९-१९८३ च्या सभेत मांडली. त्यावर सभेत असा निर्णय घेतला गेला की, सहकारी आयुक्तांनी फेडरेशनंची मागणी लक्षात घेऊन सध्याच्या व्यवस्थेत काही बदल आवश्यक आहे काय व तो काय असावा याबाबतची तपासणी करावी व शासनास अहवाल पाठवावा. याबाबत सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास असा प्रस्ताव पाठविला की, प्रायोगिक म्हणून सुरुवातीस चार - पाच जिल्हयांत काम वाटपाचे काम जिल्हा फेडरेशनला द्यावे, परंतु शासनाने दिनांक २८-८-८४ रोजी असे कळविले की, समग्र विचारांती काम वाटप समितीत बदल करण्याची आवश्यकता नाही.

परंतु या विषयाचा पुनर्विचार करून ही काम वाटप समिती परत जिल्हा फेडरेशनच्या अध्यक्षतेखाली द्यावी.

८. कमकुवत जिल्हा फेडरेशन्सना शासनाचे आर्थिक सहाय्य मिळणेबाबत

महाराष्ट्रातील सर्व २६ जिल्हयात [नवे ४ जिल्हे सोडून] जिल्हा मजूर संस्थांच्या फेडरेशन्स स्थापन झाल्या आहेत. काही जिल्हा फेडरेशन्सनी चांगली प्रगती केली आहे. काहींनी साधारण प्रगती केली आहे व काही फेडरेशन्सची परिस्थिती असमाधानकारक आहे, सर्वसाधारणपणे जिल्हा फेडरेशन्सची खालीलप्रमाणे वर्गवारी आहे -

अ. - ज्या जिल्हा फेडरेशन्सचे वार्षिक उत्पन्न एक लाख रूपयाचे पुढे व ज्यांची परिस्थिती समाधानकारक आहे अशा जिल्हा फेडरेशन्सचा समावेश "अ" वर्गात होतो.

ब. - ज्या जिल्हा फेडरेशन्सचे उत्पन्न व खर्च यांचा कसाबसा मेळ बसतो परंतु थकबाकी बरीच राहते व ज्या फेडरेशन्सजवळ तुजबी सेवकवर्ग आहे अशा फेडरेशन्सचा समावेश "ब" वर्गात होतो.

क. - ज्या फेडरेशन्सची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नाही, वसुली समाधानकारक नाही, पुरेसा कर्मचारी वर्ग नाही, कामे पुरेशी मिळत नाहीत अशा फेडरेशन्सचा समावेश "क" वर्गात होतो.

"अ" वर्गातील जिल्हा फेडरेशन्सना शासकीय आर्थिक सहाय्याची आता जरूरी नाही. फक्त त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य शासनाने दयावे.

"ब" वर्गातील जिल्हा फेडरेशन्सचे येणे उत्पन्न बरेच आहे, परंतु वसूली समाधानकारक नाही प्राथमिक मजूर सहकारी संस्थांनी १ टक्का वर्गणीची व जिल्हा फेडरेशन्सनी राज्य फेडरेशनला देण्याच्या १० टक्के [ १ टक्क्याच्या १० टक्के ] लिकिंग बाबत सहकार आयुक्तानी दिनांक ८-३-१९८५ रोजी परिपत्रक काढले त्याचा पाठपुरावा झाला तर बरीच वर्गणी जमा होईल.

"क" वर्गातील जिल्हा फेडरेशन्सना मात्र आर्थिक व प्रशासकीय मदतीची अत्यंत जरूरी आहे.

९. प्राथमिक मजूर सहकारी संस्थांची हिशोब लिहिण्याची व त्यांना रोजच्या कामात मदत करण्याच्या व्यवस्थेबाबत

वाढत्या मजूर सहकारी चळवळीच्या दृष्टीने हिशोबाची व संस्थेच्या दैनंदिन कामकाजाची व्यवस्था मजबूत पायावर उभी करणे आज आवश्यक आहे. सध्या निरनिराळ्या जिल्हयात वेगवेगळया त-हेने हे काम पूर्ण केले जात आहे व दुस-या वर्षाचे सहा महिने उलटून गेले तरी सर्व प्राथमिक मजूर सहकारी संस्थांची वेळेवर वार्षिक माहिती मिळत नाही. दप्तर लिहिलेले नसल्यामुळे या संस्थांचे वेळेवर हिशोब करण्यामध्ये ब-याच अडचणी आहेत. काही ठिकाणी या संस्थांनी आपले सचिव नेमले आहेत. तर काही जिल्हयांत तीन-चार मजूर सहकारी संस्थांत मिळून एक सचिव काम करतो. काही फेडरेशन्स मध्ये हिशोब लिहिणारे नेमून हिशोब पूर्ण करून घेतले जातात. त्यामुळे आजची व्यवस्था ही अत्यंत असमाधानकारक आहे.

प्राथमिक संस्थांची हिशोबाची कामे पूर्ण करणे त्याचप्रमाणे त्यांच्यावर देखरेख करणे ही जबाबदारी पोटनियमाप्रमाणे जिल्हा फेडरेशनची आहे. पण याबाबतीत अहमदनगर व औरंगाबाद सोडून बाकी जिल्हयांत जिल्हा फेडरेशन्सनी स्वत: जबाबदारी स्वीकारून कोणतेही काम केलेले नाही यादृष्टीने या प्रश्नावर खालील बाबींवर विचार व्हावा.

१. जिल्हा फेडरेशनने प्राथमिक मजूर सहकारी संस्थांचे गट पाडून साधारणत: ३ ते ५ जवळच्या मजूर सहकारी संस्थांना एक सचिव असेल याप्रमाणे आखणी करावी.

२. सहकारी खात्याचा निवृत्त तपासणीस किंवा इतर सहकारी अधिकारी सचिव नेमता येईल.

३. नवीन नेमलेल्या कर्मचाऱ्यासाठी जिल्हा व विभागीय सहकारी बोर्डामार्फत त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

४. प्रत्येक जिल्हयात नेमण्यात येणाऱ्या कर्मचारी वर्गावर अधिकार कोणाचा असावा हा प्रश्न वादग्रस्त आहे. फेडरेशनचा अधिकार असू नये असे वाटणे स्वाभाविक आहे. प्राथमिक मजूर सहकारी संस्थांनी या वादात न शिरता हा कर्मचारी वर्ग जिल्हा फेडरेशन यांचे संमतीने प्राथमिक मजूर सहकारी संस्थांनी नेमावा. असा कर्मचारी वर्ग जिल्हा फेडरेशनने उपलब्ध करुन घ्यावा. त्यांच्या पगाराची, प्रवास भत्याची जबाबदारी प्राथमिक मजूर सहकारी संस्थांची राहील. अडचण असल्यास जिल्हा फेडरेशनने प्राथमिक मजूर सहकारी संस्थेला मदत करावी. प्राथमिक मजूर सहकारी संस्थांच्या विनंती वरुन सचिव बदलून देणेचे काम जिल्हा फेडरेशन करील. या मदतीसाठी येणारा थोडा खर्च वगळता जिल्हा फेडरेशनवर अधिक आर्थिक बोजा पडणार नाही.

५. या व्यवस्थेबाबत संबंधित प्राथमिक मजूर सहकारी संस्था व जिल्हा फेडरेशन यांच्या कार्यकारी मंडळांच्या सभेचा ठराव होऊन परस्पर करार व्हावा.

६. प्रत्येक जिल्हयाच्या परिस्थितीनुसार सचिवाचे वेतन, भत्ते जिल्हा फेडरेशन यांनी जिल्हा उपनिबंधकाचे सल्ल्याने ठरवावेत.

महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात ही योजना लागू करु नये, प्रथमत: प्रायोगिक म्हणून खालील जिल्हयात याची सुरुवात करावी.

१. पुणे, २. अहमदनगर ३. सोलापूर ४. सांगली ५. सातारा ६. नाशिक ७. ठाणे ८. धुळे ९. जळगांव १०. औरंगाबाद ११. नांदेड १२. भंडारा १३. अकोला

या योजने बाबतचा आराखडा जिल्हा फेडरेशन्सनी तयार करावा.

वरील सर्व अडचणींची जर सोडवणूक झाली तर ही चळवळ चांगली व अपेक्षित प्रगती करू शकेल अशी आशा वाटते.

**४.३**

सहकारी महाराष्ट्र, सप्टेंबर १९८४ या अंकात मजूर सहकारी संस्था- "आत्म परीक्षणाची गरज" या मथळ्याखालील लेखात वि. शं. नाखे [प्राचार्य सहकारी प्रशिक्षण केंद्र, सांगली] यानी मजूर सहकारी संस्थांच्या समस्या व त्यावरील उपाय योजना, खालीलप्रमाणे सांगितलेल्या आहेत.

मजूर सहकारी संस्थांच्या समस्या व उपाय -

मजूर सहकारी संस्थांपुढे अनेकविध समस्या उभ्या आहेत.. या समस्यांची गंभीरपणे दखल घेतली जात नसल्याने त्यांची सोडवणूक होत नाही, यासाठी मजूर सहकारी संस्थांच्याकार्यकर्त्यांनी संघटितपणे व प्रभावीपणे आपली बाजू शासनापुढे मांडून स्वत: जागृत राहून समस्या सोडवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची आवश्यकता आहे.

समस्या/उपाय -

१. काम देणा-या खात्यांकडून नियमाप्रमाणे कामे मिळत नाहीत -

मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या वर्गीकरणानुसार विशिष्ट मर्यादेपर्यंत अग्रहक्काने कामे देण्याचे धोरण स्वीकारले आहे. हा नियम शासकीय व निमशासकीय

खात्यांनाही लागू करण्यात आला. परंतु या धोरणाची अंमलबजावणी नीटपणे होऊ शकली नाही. बारीक सारीक तांत्रिक मुद्दे उपस्थित करुन ही कामे मजूर सहकारी संस्थांऐवजी खाजगी ठेकेदारांनाच फार मोठ्या प्रमाणावर [जवळ जवळ ८५टक्के] देण्यात आली.

मजूर सह. संस्थांना कामे देतानाही काही ठिकाणी गैरसोईची कामे देणे, कामाचे मोजमाप वेळेवर न करणे, बिलाच्या रकमा लवकर मंजूर न करणे इ.प्रकारामुळे मजुरांच्या सहकारी संस्थांना खाजगी ठेकेदारांशी स्पर्धा करणे अशक्य होते. तरी असे प्रकार घडणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

२. मंजूर रकमेची मर्यादा वाढविली पाहिजे -

मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या वर्गीकरणानुसार [अ,ब,क] विशिष्ट मर्यादेपर्यंतच्या किंमतीची कामे अग्रहक्काने निविदा न मागविता देण्यात यावीत असे धोरण आहे. परंतु सतत वाढणारे वस्तूंचे भाव, मजुरीचे दर इत्यादी बाबी लक्षात घेऊन कालबाह्य झालेले दर बदलून मंजूर रकमेच्या मर्यादेसंबंधी दर तीन वर्षांनी पुनर्विचार होण्याची गरज आहे.

३. जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन हे ख-या अर्थाने जिल्ह्यातील सर्व मजूर सहकारी संस्थांचे पालक बनले पाहिजे -

जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन ही जिल्ह्यातील सर्व मजूर सहकारी संस्थांची पालक संस्था आहे. प्राथमिक मजूर सहकारी संस्था या मुळातच अज्ञानी, दुर्बल, असंघटित लोकांच्या असल्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे. परंपरेने चालत आलेल्या धूर्त, कुशल व सबळ ठेकेदारांशी त्या स्वत:च्या बळावर स्पर्धा करु शकत नाहीत. मजूर फेडरेशनने

या प्राथमिक मजूर सहकारी संस्थांचे सर्वार्थाने पालकत्व स्वीकारून त्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. परंतु आज या फेडरेशनचे अधिकार कमी कमी होत आलेले आहेत. काम वाटप समितीचे अध्यक्ष, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हे सरकारी अधिकारी आहेत. तर काम वाटप समितीत इतर तीन सरकारी अधिकारी आहेत. याचा अर्थ या समितीचे पूर्णपणे सरकारीकरण करण्यात आले आहे. सहकारी तत्वांची शासनाने केलेली ही विटंबना आहे, यासाठी काम वाटप समितीची पुनर्रचना करणे हे सहकारी तत्वाशी सुसंगत होणार आहे.

जिल्हा मजूर फेडरेशनचे अध्यक्ष हे काम वाटप समितीचे अध्यक्ष असावेत. ही समिती पुढीलप्रमाणे असावी.

| | |
|---|---|
| १. जिल्हा मजूर फेडरेशनचे अध्यक्ष | - अध्यक्ष |
| २. जिल्हा उपनिबंधक - उपअभियंता | - सचिव |
| ३. जिल्हा उपनिबंधक - सहकारी संस्था | - सदस्य |
| ४. काम वाटप खात्याचे अधिकारी | - सदस्य |
| ५. प्राथमिक मजूर सहकारी संस्था प्रतिनिधी दोन | - सदस्य |

त्याच प्रमाणे प्राथमिक मजूर सहकारी संस्थांची नोंदणी करणे, त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करणे वगैरे प्रसंगी जिल्हा मजूर फेडरेशनशी सल्ला घेण्याचे बंधन सहकारी खात्यावर असले पाहिजे. परंतु आज असा सल्ला घेतलाच पाहिजे असे बंधन नाही. त्यामुळे ही पालक संस्था असूनही ती उपेक्षित आहे.

४. कार्यक्षम कर्मचाऱ्यांचा अभाव -

कोणत्याही संस्थेचे कामकाज योग्य पध्दतीने चालण्यासाठी कार्यक्षम व

तज्ञ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. मजूर सहकारी संस्था या व्यावसायिक संस्था आहेत. या संस्थांजवळ तज्ञ कर्मचारी नसेल तर त्या नीटपणे काम करू शकणार नाहीत. पगाराची अडचण सांगून चालणार नाही. तीही एक गुंतवणूक आहे असे समजून आवश्यक त्या पात्रतेच्या कर्मचारी वर्गाची उपलब्धता करून घेतली पाहिजे. ही जबाबदारी फेडरेशनने स्वीकारली पाहिजे. या कर्मचारी वर्गावर निश्चित स्वरूपाचे नियंत्रण असले पाहिजे. तरच मजूर सहकारी संस्थांचे दप्तरी कामकाज योग्य पध्दतीने ठेवले जाऊन आज चालू असलेल्या काही गैरव्यवहारांना आळा घालणे शक्य होईल.

५. श्रम हेच भांडवल समजून बँकांनी भांडवल पुरवावे -

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून या मजूर सहकारी संस्थांना गरजेप्रमाणे पैसा उपलब्ध होत नाही अशी तक्रार या मजूर सहकारी संस्थांची आहे. बँकेच्या दृष्टीकोनातून बँकेचे ही म्हणणे बरोबर आहे. पैसे वसुलीची सुरक्षितता पाहिल्याशिवाय बँका पैसे देणार नाहीत हेही खरे आहे. यातून उभयतांनी विचार विनिमय करून व्यवहारिक मार्ग काढला पाहिजे.

"श्रम हेच भांडवल" आहे हे तत्व मान्य करून मजूर सहकारी संस्था प्रत्यक्ष काम करण्यास कितपत कार्यरत होईल हे पाहून त्याप्रमाणात भांडवल उपलब्ध करून देण्यास बँकांनी पुढे आले पाहिजे" श्रम पतपेढी"निर्माण करणे शक्य होईल का ? याचाही विचार मजूर सहकारी संस्थांनी करण्याची वेळ आलेली आहे.

६. मजूर सहकारी संस्थांच्या कठोर आत्मपरिक्षणाची गरज -

मजुरांच्या अनेक सहकारी संस्था या ठेकेदारांच्या संस्था आहेत असा आक्षेप या क्षेत्रातील कार्यकर्तेच घेत असतात. त्यात किती सत्य आहे, हे पडताळून

पाहिले पाहिजे. मजूर सहकारी संस्थांमधून ठेकेदारांची हकालपट्टी झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने त्या मजूर सहकारी संस्था होऊ शकणार नाहीत. केवळ मजुरांना जादा मजुरी मिळावी एवढाच मर्यादित हेतू या मजूर सहकारी संस्थांचा नाही, मजूर व्यसनमुक्त व्हावेत, संघटित व्हावेत, त्याच्यातूनच या संस्था चालविणारे नेतृत्व निर्माण व्हावे व त्याचबरोबर सामाजिक राष्ट्रीय भावनेतून काम करावयाचे असल्यामुळे कामाचा दर्जा योग्य रहावा गैरव्यवहार न व्हावेत हे समाजाचे, राष्ट्राचे काम आहे. अशी उदात्त राष्ट्रीय भावना निर्माण व्हावी अशा या संस्थांकडून अपेक्षा आहेत.

शासनाचे सहकार्याचे धोरण आहे, आणि ते राहील. इतकेच नव्हे तर लोकशाही पध्दतीने दबाव आणून तसे धोरण आखण्यास भाग पाडण्यात येईल परंतु ज्यांनी या मजूर सहकारी संस्था चालवावयाच्या त्या कार्यकर्त्यांनी आत्मपरीक्षण करून मजूर सहकारी संस्थांचा जो मूळ उद्देश आहे तो डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करण्याची गरज आहे. यात अनेक अडचणी आहेत. अनेक हितसंबंधांना विरोध करावा लागणार आहे, परंतु हे केल्याशिवाय या चळवळीचे शुध्दीकरण होणार नाही. ज्यांना काहीही नाही अशा लाखो लोकांना आधार देण्याचे, त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला त्यांना देण्याचे, त्यांच्या जीवनात आशेचा नवा किरण निर्माण करण्याचे, सामाजिक न्याय मिळवून देण्याचे सामर्थ्य मजूर सहकारी चळवळीत आहे आणि म्हणून ती यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील होण्याची गरज आहे. तरच सहकारी चळवळ ही दुर्बलांसाठी आहे. या म्हणण्यास काही अर्थ राहील.

४.३

सहकारी महाराष्ट्र, जुलै १९८५ या अंकाच्या संपादकीय मध्ये "श्रमाचा योग्य मोबदला मजुरांना मिळाला पाहिजे" या शीर्षका-खालील लेखामध्ये मजूर

सहकारी संस्थांच्या समस्या व त्यावरील उपाय खालीलप्रमाणे सांगितले आहे त.

मजूर सहकारी संस्थांच्या समस्या व उपाय :-

१. मजूर सहकारी संस्थेमध्ये हितसंबंधी लोकांचा शिरकाव :-

मजूर सहकारी संस्थाचे महत्व अनन्य साधारण आहे तरीही अनेक मजूर सहकारी संस्थाचे काम समाधानकारक नाही. काही बंद अवस्थेत आहे तर काही मजूर सहकारी संस्थेत हितसंबंधी लोकांचा शिरकाव झालेला आहे, मजूराचे शोषण करुन हितसंबंधी विनाकष्ट आपले जीवन कंठीत आहेत.

यामुळे यामध्ये सुधारणा होण्याची गरज आहे. ख-या मजूरांच्या मजुरीसाठी, मजूरांची ठेकेदाराकडून होणारी पिळवणूक थांबवून त्यांना न्याय देणा-या, त्यांच्या कष्टाचा मोबदला देणा-या शक्तीशाली मजूर सहकारी संस्थांची वाढ झाली पाहिजे. दुर्बल घटक व मजूर यांच्या नांवावर कामे मिळवून, आर्थिक मदत व सवलती मिळविणा-या हितसंबंधी व्यक्तींचे या क्षेत्रातून उच्चाटन झाले पाहिजे.

महाराष्ट्राचे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी त्यांचेकडील परिपत्रक दिनांक १९.४.१९८५ अनुसार नवीन मजूर सहकारी संस्था स्थापन करणे व त्यांच्या कामकाजासंबंधी नवीन मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. शासनाकडून मिळणा-या सवलतींचा फायदा मजूरांच्या नांवावर इतर हितसंबंधी लोकांनी घेऊ नये. म्हणून नवीन मजूर सहकारी संस्था मजूरांनीच

त्यांच्यासाठी स्थापन केलेल्या आहेत किंवा कसे हे कसोशीने पहाण्याचे दृष्टीने या मार्गदर्शक सूचना उपयुक्त आहेत. मजूर सहकारी संस्थेची स्थापना व तिचे कामकाज याबाबतीत नवीन धोरण आखण्यात आलेले आहे. व नोंदणीच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनानुसार विभागीय पातळीवर एक समिती संघटित करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशीनुसार नवीन संस्थांची नोंदणी होणार आहे. जिल्हा व राज्य पातळीवरील मजूर सहकारी संस्था फेडरेशनचे प्रतिनिधी या समितीवर आहेत. तांत्रिक अधिकारी आहेत. त्यामुळे नवीन मजूर सहकारी संस्था स्थापन करताना गैरप्रकार किंवा चुकीच्या निर्णयाची शक्यता राहणार नाही. निकोप व भक्कम सहकारी चळवळ उभी राहण्यास यामुळे मदत होईल.

२. <u>महाराष्ट्र शासनाचे मजूर सहकारी संस्थांबाबत अनिश्चित धोरण</u> -

मजूर सहकारी संस्थांना अनेक अडीअडचणींना आणि समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यापैकी एक समस्या म्हणजे केंद्र व राज्य शासनाचे मजूर सहकारी संस्थांबाबत सातत्यपूर्ण व निश्चित असे धोरण नाही. वेळोवेळी व गरजेनुसार या संस्थांकडे वरवर लक्ष देण्यात येते. परंतु हे उचित नाही. या मजूर सहकारी संस्थांच्या समस्यांबाबत राष्ट्रीय पातळीवर सल्लागार मंडळाचे संघटन करण्यात आलेले आहे. व या मंडळाच्या शिफारशी केंद्र शासनाने काही प्रमाणात स्वीकारलेल्या आहेत.

तद्वतच महाराष्ट्रात मजूर सहकारी संस्थांच्या प्रश्नाचा विचार महाराष्ट्र राज्य सहकारी मंडळाने केला पाहिजे. महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन बरोबरही त्यांच्या प्रश्नांबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात आला पाहिजे. शासनाने मजूर सहकारी संस्थांना दिलेल्या सवलतींचा व सहाय्याचा पूर्ण फायदा मिळत नाही. शासकीय यंत्रणेच्या उदासीनतेमुळे या प्रक्रियेत अडचणी निर्माण होतात. दुर्बल घटकांचे कल्याण करण्याची बांधीलकी मानण्याचा दृष्टिकोन शासकीय यंत्रणेकडे अभावानेच असल्याचे दिसून येते. यातही बदल होण्याची गरज आहे.

३. मजूर सहकारी संस्थांना नाबार्डकडुन मिळणा-या कर्ज पुरवठयाचा अभाव -

नाबार्डकडून शेती कर्जपुरवठा सवलतीच्या व्याजदराने मोठया प्रमाणात होतो. परंतु गरीब मजूर सहकारी संस्थांना या व्याज सवलतींचा फायदा मिळत नाही. नाबार्डच्या मूळ दृष्टीकोनात व धोरणात बदल होण्याची गरज आहे. शेतीसाठी दिल्या जाणा-या कर्जपुरवठयाचे बाबतीत ज्या सोयी सवलती दिल्या जातात, तशाच सोयी-सवलती मजूर सहकारी संस्थांनाही उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. किंबहुना दुर्बल घटकांना मदत करण्याच्या हेतूने अधिक मदत व सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून सवलती दिल्या पाहिजेत.

४. मजूर सहकारी संस्थांना मिळणा-या आय करातील सवलतीतील विरोधाभास-

मजूर सहकारी संस्थांना आयकर कायदा कलम ८० [सी] अनुसार सूट देण्यात आलेली आहे. तरीही मजूर सहकारी संस्थांच्या कामाच्या बिलातून २ टक्के आय कर कापला जाण्याची सक्ती आहे, हा विरोधाभास संपला पाहिजे. म्हणून आय कर कायद्यात जरूर ती सुधारणा करण्यात यावी.

५. शासनाकडून मिळणारी मदत व कामे अपुरी -

केंद्र शासनाकडून राज्य शासनाला मजूर सहकारी संस्थांना सहाय्य करण्यासाठी एकत्रित अनुदान देण्यात येते व निधी उपलब्ध करून देण्यात येतात. परंतु राज्य पातळीवर हे निधी इतर बाबींसाठी वापरण्यात येतात किंवा काटकसरीची उपाययोजना म्हणून शासनाकडून मजूर सहकारी संस्थांना देण्यात येणा-या मदतीमध्ये मोठया प्रमाणात कपात करण्यात येत असल्याचे अनुभवास येते.

परंतु असे होणे रास्त नाही.

शासकीय बांधकामे व इतर कामे देतानाही शासकीय यंत्रणेकडून मजूर सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जात नाही. अनेक नियम व अटींच्या अडचणी निर्माण केल्या जातात. त्यामुळे या मजूर सहकारी संस्थांना कामे मिळत नाहीत. मजूर सहकारी संस्थांच्या सर्व सभासदांना विद्यमान परिस्थितीत कामे पुरविणे शक्य होत नाही. काही काळ हे सभासद बेकारच राहतात. शासनाची कामे मजूर सहकारी संस्थांकडून पार पाडण्यात यावीत जर मजूर सहकारी संस्थांना पुरेशी कामे मिळून काही कामे शिल्लक राहिल्यास अन्य यंत्रणेंकडून शासनाने स्वत: ही कामे पार पाडावीत. मजूर सहकारी संस्थांना शासकीय बांधकामे देण्याच्या धोरणात आमूलाग्र बदल होण्याची गरज आहे. मजूर सहकारी संस्थांना पुरेशी कामे उपलब्ध झाल्यास ग्रामीण भागातील बेकारी कमी करण्यास हातभार लागेल.

६. मजूर सहकारी संस्थांना योग्य नेतृत्वाचा अभाव -

मजूर सहकारी चळवळ वाढण्यास खूपच वाव आहे पण यासाठी नवीन व प्रगतीशील नेतृत्त्व निर्माण होण्याची गरज आहे. परंतु अशा नेतृत्वाचा मजूर सहकारी चळवळीमध्ये अभाव असलेला दिसून येतो.

परंतु मजूर सहकारी संस्थांच्या विकासासाठी तांत्रिक ज्ञान, अनुभव, सेवाभाव व मजूरांचे हित साधण्याची कळकळ असणारे नेतृत्व या मजूर सहकारी संस्थांना लाभले पाहिजे. मजूर सहकारी संस्थांमधूनच हे नवीन नेतृत्व उदयास आले पाहिजे. त्यामुळे मजूर सहकारी संस्थांच्या क्षेत्रातून हितसंबंधीयांचा प्रभाव कमी होईल. त्यांचे उच्चाटन होईल व या चळवळीची सर्वसाधारण प्रतिमा उंचावण्यास मदत होईल.

४.४.

भारतातील मजूर सहकारी संस्थांच्या समस्या अडचणी लक्षात घेऊन त्या सोडविण्यासाठी आठव्या आणि नवव्या भारतीय सहकारी अधिवेशनानी काही महत्वपूर्ण अशा शिफारशी केलेल्या आहेत. त्यांच्यामते मजूर सहकारी संस्था या संघटनात्मक, आर्थिक आणि इतर बाबतीत दुबळया ठरलेल्या आहेत. मजूर गरीब असल्याने ते मजूर सहकारी संस्थांचे भाग भांडवल घेऊ शकत नाहीत. म्हणून सरकार आणि सहकारी वित्तीय संस्थांनी अशा मजूर सहकारी संस्थांना मोठया प्रमाणात मदत करावयास हवी. खेळत्या भांडवलासाठी मजूर सहकारी संस्थांना मदत करावयाला हवी व याबाबतीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्कानी जबाबदारी घेतली पाहिजे. कामाच्या मुदतीमध्ये मजूर सभासदांना त्यांनी केलेल्या कामाची मजुरी देण्यासाठी मजूर सहकारी संस्थांना काम देणा-या खात्यांच्याकडून दिलेल्या कामाच्या किंमतीच्या २५ ते ३० टक्के अग्रीम दिला पाहिजे. काम देणा-या खात्यांच्या कडून मजूर सहकारी संस्थांना कामाचा आराखडा, कामाचा प्रकार, कामाचा कालावधी इ. ची आगाऊ सूचना दिली तर मजूर सहकारी संस्थांना मदत होऊ शकले. पंचायत राज्य संस्थांनी आपली कामे मजूर सहकारी संस्थांनाच दिली पाहिजेत. ग्रामीण श्रमशक्तीचा योग्य वापर होण्यासाठी व कामामध्ये सातत्य टिकून राहण्यासाठी मजूर सहकारी संस्थांना उत्तेजन दिले पाहिजे. मजूर सहकारी संस्था या ख-या अर्थाने मजूरांच्या संस्था असाव्यात आणि अशा संस्थांमध्ये खाजगी ठेकेदारासारखे मजूर सभासद खोटे असू नयेत.

आठव्या भारतीय सहकारी अधिवेशनाच्या शिफारशी [१९७९]

( Recommendation of the Eighth Indian Co-operative congress (1979) )

१. प्रत्येक राज्य सरकारने "मजूर आणि कंत्राट संस्थांचे मंडळ" स्थापन करावे. त्याचे अध्यक्ष मुख्यमंत्री असावेत आणि सहकारी संस्थांचे निबंधक, जिल्हा मजूर सहकारी संस्थांच्या संघांचे प्रतिनिधी, राज्य मजूर सहकारी संस्थांच्या संघाचा प्रतिनिधी आणि विधान-सभेचा एक प्रतिनिधी हे या बोर्डाचे सदस्य असावेत. जिल्हा पातळीवर जिल्हा समन्वय समिती स्थापन करावी. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आणि काम देणा-या खात्यांचे अधिकारी, सहकारी खात्यांचे अधिकारी आणि मजूर सहकारी संस्थांचा प्रतिनिधी हे या समितीचे सदस्य असावेत.

२. राज्य सरकार ज्याप्रमाणे जिल्हा मजूर सहकारी संस्थांच्या संघांना स्थापनेच्या बाबतीत अनुदान, मदत देते त्याचप्रमाणे राज्यपातळीवरील राज्य मजूर सहकारी संस्थांच्या संघाच्या भागभांडवलामध्ये राज्य सरकारने सहभाग द्यावा.

३. राज्य सरकारने मजूर सहकारी संस्थांना खालील प्रकारची मदत करावी -

अ. मजूर सहकारी संस्थांनी पूर्ण केलेल्या कामाची बिले त्यांना वेळेवर मिळण्यासाठी कोषागारातून देण्याऐवजी बँक ऑफ इंडियाच्या ड्राफ्टने द्यावीत.

ब. उशिरा बिले दिल्यास त्या रकमेवरील व्याज देण्यास संबंधित अधिका-यास जबाबदार धरावे.

क. मजूर सहकारी संस्थांना कामाच्या किंमतीची मर्यादा न घालता अकुशल कामे द्यावीत.

ड. मजूर सहकारी संस्थांच्या अ, ब आणि क या वर्गीकरणानुसार त्यांना कुशल कामे अनुक्रमे ५ लाख रुपये, ३ लाख रुपये, आणि १ लाख रुपयां पर्यंतची द्यावीत.

इ. वरील रकमे पर्यंतच्या कामांची निविदा मजूर सहकारी संस्थांच्या कडून भरून घेतली जाऊ नये.

ज्या कामामध्ये सिमेंट व लोखंड या घटकांचा वापर केला जातो ते काम कुशल समजावे आणि इतर कामे अकुशल समजावीत.

४. जे सरकारी अधिकारी त्यांचेकडे उपलब्ध असलेली कामे मजूर सहकारी संस्थांनाच देतात त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये स्फूर्तीदायक व चांगले शेरे द्यावेत. व जे अधिकारी मजूर सहकारी संस्थांच्या ऐवजी खाजगी कंत्राटदारांना कामे देतात त्यांच्या गोपनीय अहवालात प्रतिकूल शेरे द्यावेत.

५. मजूर सहकारी संस्था कर्ज उभारु शकत नसल्याने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने त्यांना कर्जे देण्यासाठी एक वेगळा स्वतंत्र निधी निर्माण करावा व त्यांचे वाटप मध्यवर्ती बँकेमार्फत करावे. याशिवाय कर्जावरील व्याजाचा दर तुलनात्मकदृष्टया कमी असावा आणि मजूर सहकारी संस्थांना, जिल्हा व राज्य स्तरावरील मजूर सहकारी संस्थांच्या संघांना त्यांच्या भाग भांडवलाच्या २० पटीइतके कर्ज द्यावे.

६. मजूर सहकारी संस्थांच्याकडून सुरुवातीच्या काळात उत्पन्नकर वसूल न करता वार्षिक हिशोब तपासणी झाल्यानंतर वर्षाच्या शेवटी उत्पन्न कर वसूल करण्यात यावा.

७. मजूर सहकारी संस्थांमधील कमतरता आणि दुर्बलता कमी करण्याच्या दृष्टीने तपासणी अधिका-याने सूचना द्याव्यात व त्यांची माहिती दर महिन्यास उपविभागिय कार्यालयाकडे द्यावी.

८. सहकारी खात्यांच्या अधिका-यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिका-यांना वेळोवेळी भेटावे आणि जिल्हा पातळीवरील कार्यकारी अभियंत्यास सहाय्यक निबंधकाने दोन महिन्यातून एकदा तर अधीक्षक अभियंत्यास उपनिबंधकाने तीन महिन्यातून एकदा भेटावे.

९. मजूर सहकारी संस्थांच्या प्रचाराचा अभाव आहे गुंतलेल्या हित संबंधामुळे त्या दुबळयाही ठरलेल्या आहेत, म्हणून राष्ट्रीय पातळीवरील मजूर सहकारी संस्थांच्या संघाने जिल्हा पाताळीवरील आणि राज्य पातळीवरील मजूर सहकारी संस्थांचे संघ रचनात्मकदृष्टया सामर्थ्य वाढविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत आणि मोठया प्रमाणावर त्यांच्या कामगि-यांच्या व यशाचा प्रचार केला पाहिजे.

१०. मजूर सहकारी संस्थांच्या सभासदांनी आणि कर्मचा-यांनी भारतातील व भारताबाहेरील अशा प्रकारच्या संस्थांचा अभ्यास केला पाहिजे आणि राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरील मजूर सहकारी संस्थांच्या संघांनी अशा प्रकारच्या अभ्यास दौ-यांचे आयोजन करावे.

११. मजूर सहकारी संस्थांना तांत्रिक मदत देण्यासाठी राज्य पातळीवरील मजूर सहकारी संस्थांच्या संघाने तांत्रिक शिक्षणाची सोय करावी प्राथमिक मजूर सहकारी संस्था आणि जिल्हा संघ यांची तांत्रिक गरज पूर्ण करण्यासाठी राज्य संघाने असा प्रशिक्षित वर्ग तयार करावा.

१२. मजूर सहकारी संस्थांना मिळालेल्या कामाच्या एकूण किंमतीच्या २० टक्के रक्कम बिनव्याजी अग्रीम म्हणून कामाच्या पूर्ततेसाठी जशी सध्या

महाराष्ट्रात दिली जाते तशी देश पातळीवर देण्यात यावी.

१३. मजूर सहकारी संस्थांचे सभासद कामगार हे त्या संस्थांचे मालक असल्याने अशा संस्थांना कामगार करार कायदा लागू करू नये.

१४. मजूर सहकारी संस्थांना दिलेल्या कामाची कार्यवाही व त्यांच्या कामाची बिले या संदर्भातील तंटे सध्या त्या विभागाचे अधीक्षक अभियंता यांचेकडून सोडविले जातात, त्याऐवजी काम देणा-या खात्यांचा एक अधीक्षक अभियंता, जिल्हाधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी आणि सहकारी खात्याचा एक अधिकारी यांचा लवाद नेमावा.

१५. सहकारी संस्थांची सर्व बांधकामे मजूर सहकारी संस्थांच्यासाठी खास राखून ठेवण्यात यावीत.

१६. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील जे मजूर सहकारी संस्थांचे संघ आहेत त्यांना खात्रीशीर उत्पन्नाचे मार्ग नाहीत आणि असे संघ गरीब मजूरांच्या प्राथमिक मजूर सहकारी संस्थांच्या वर्गणीवर व सहभागावर अवलंबून राहू शकत नाहीत. पण या संघांना आपल्या प्रगतीसाठी व व्यवसायिक कार्यासाठी पुरेसा तंत्रज्ञ वर्ग, साधने आणि अवजड यंत्रे ठेवावी लागतात. म्हणून भारत सरकारने किंवा राज्य सरकारने १० ते १५ वर्षासाठी अशा संघांना पुरेसे आर्थिक सहाय्य केले पाहिजे.

नवव्या भारतीय सहकारी अधिवेशनाच्या शिफारशी [१९८२]

(Recommendations of the Ninth Indian Co-operative Congress (1982) )

१. नवीन २० कलमी कार्यक्रमात समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीवर भर दिल्याने मजूर सहकारी संस्थांची व्याप्ती व महत्त्व वाढले आहे. म्हणून हा कार्यक्रम

मजूर सहकारी संस्थांच्या मार्फत राबवावा.

२. मजूर सहकारी संस्थांच्या विकासासाठी व ग्रामीण कामे, आणि जंगल विभागातील कामामधून खाजगी कंत्राटदारांना वगळण्यासाठी भारत सरकारने निश्चित स्वरूपाची व स्पष्ट मार्गदर्शक तत्वे तयार करावीत. राज्य सरकारची कामे ही फक्त मजूर सहकारी संस्थांच्या मार्फत केलेली आहेत किंवा नाही याची खात्री करावी.

३. मजूर सहकारी संस्थांच्या विकासास मदत करणारे १९७४ मधील राष्ट्रीय सल्लागार मंडळ आता अस्तित्वात नसल्याने मजूर सहकारी संस्थांच्या विकासात अडचण निर्माण झालेली आहे. तरी लवकरात लवकर या मंडळाचे पुनरुज्जीवन करावे.

४. मजूर सहकारी संस्थांच्या विकासासाठी, त्यांचे प्रश्न समजावून घेऊन त्यावर आवश्यक त्या शिफारशी करण्यासाठी भारत सरकारने मजूर सहकारी संस्थांमधील लोकांचा एक कार्यकारी गट निर्माण करावा.

५. मजूर सहकारी संस्थांचे सभासद होण्यासाठी आवश्यक असणा-या पात्रतेच्या कृत्रिम अडचणी संबंधित राज्य सरकारने दूर करून कुटूंबातील प्रौढ व्यक्तींना मजूर सहकारी संस्थांचे सभासद करून घेण्यासाठी परवानगी द्यावी. आवश्यकता वाटल्यास कुटूंबातील कमीत कमी किती लोकांना मजूर सहकारी संस्थांचे सभासद होता येईल याचे बंधन घालावे.

६. मजूर सभासदांना नियमित व पुरेसे काम उपलब्ध करून देण्या- इतपत मजूर सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र असावे, जर त्या क्षेत्रात त्या संस्थेला काम उपलब्ध नसेल तर त्याच जिल्हयात किंवा दुस-या जिल्हयात [त्या भागातील मजूर सहकारी संस्थांच्या कामावर विपरित परिणाम होणार नसेल तर ] त्या संस्थेला त्या भागात काम द्यावे.

७. ज्या ठिकाणी जिल्हा किंवा राज्य पातळीवरील मजूर सहकारी संस्थांचे संघ नाहीत त्या ठिकाणी असे संघ स्थापन करण्यासाठी सुरुवातीला संबंधित राज्यांचे सहकार खाते किंवा राज्य सहकारी संघ यांनी भाग घ्यावा. तसेच या कामात राष्ट्रीय

मजूर सहकारी संस्थांच्या संघाने पुढाकार घ्यावा व योग्य ते मार्गदर्शन करावे.

८. अकार्यक्षम मजूर सहकारी संस्थांचे विशिष्ट कालावधीत पुनरुज्जीवन घडवून आणण्याच्या कार्यक्रमासाठी आवश्यक त्या सूचना आणि मार्गदर्शक तत्वे भारत सरकारने राज्य सरकारना पुरवावीत हा पुनरुज्जीवनाचा कालावधी ३ वर्षांचा असावा.

९. ईशान्य भागातील कंत्राट, बांधकाम आणि जंगल कामगारांच्या मजूर सहकारी संस्थांच्या विकासासाठी विशेष योजना तयार कराव्यात.

१०. मजूरांची आर्थिक दुरावस्था आणि मजूर सहकारी संस्थांची आर्थिक दुर्बलता लक्षात घेऊन मजूर सहकारी संस्थांच्या सभासदांना भाग भांडवल घेण्यासाठी भारत सरकार किंवा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने भाग भांडवलासाठी कर्जाच्या स्वरूपात सभासदांना अग्रीम देण्यासाठी एक योजना तयार करावी.

११. राज्य सरकारने या संस्थांच्या भाग भांडवलात सहभागी होण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने एक योजना तयार करावी. संस्था व राज्य सरकार यातील त्यातील सहभाग २५:७५ या प्रमाणात असावा. एखाद्या प्राथमिक सहकारी संस्थेच्या भाग भांडवलातील राज्याचा सहभाग किमान १०,००० रुपये इतका तरी असावा. जिल्हा व राज्य पातळीवरील मजूर सहकारी संस्थांच्या बाबतीतही अशाच स्वरूपाच्या मर्यादा भाग भांडवलातील सहभागाच्या संदर्भात निश्चित करण्यात याव्यात.

१२. आर्थिक व सामाजिक दृष्टया दुर्बल असणाऱ्या मजूर सभासदांच्या मजूर सहकारी संस्थांना सहकारी बँकांच्या मार्फत कमी व्याजाच्या दराने अर्थ पुरवठा करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने प्राधान्य द्यावे.

१३. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ११ टक्के पेक्षा जास्त व्याज दराने मजूर सहकारी संस्थांना कर्जे देऊ नयेत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१४. मजूर सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून दिली जाणारी रोख कर्जे कमीत कमी १५,००० रूपये मर्यादेपर्यंत मंजूर करावीत. सरकार व सार्वजनिक क्षेत्रातील कामाची बिले आणि धनादेश यांच्या तारणावर मजूर सहकारी संस्थांना कर्जे अॅडव्हान्स देण्याची व्यवस्था करावी.

१५. मजूर सहकारी संस्थांना यंत्रे आणि यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी मुदत कर्जे देण्यासाठी एक योजना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने तयार करावी. त्याचबरोबर मजूर सहकारी संस्थांची खेळत्या भांडवलाची आणि मुदत कर्जाची गरज भागविण्यासाठी संयुक्त कर्जे देण्याची योजना तयार करावी.

१६. कायदयामध्ये बदल करून मजूर सहकारी संस्थांचा सूचित यादीमध्ये समावेश करून राष्ट्रीय विकास महामंडळाने मजूर सहकारी संस्थांना आर्थिक व तांत्रिक मदत देण्याची योजना तयार करावी.

१७. मजूर सहकारी संस्थांच्या कडून उत्पन्न कर उगमस्थानीच कापून घेण्यात येऊ नये.

१८. कंत्राटदारांना मिळालेल्या कामांच्या ५० टक्केपेक्षा कमी किंमतीचे काम मजूर सहकारी संस्थांच्याकडे असेल तर त्यांच्याकडून इसारा रक्कम आणि सुरक्षा अनामत घेऊ नये.

<u>काम देणा-या माध्यमांची भूमिका -</u>

१९. प्रत्येक राज्य सरकारने सर्व अकुशल कामे मजूर सहकारी संस्थांच्यासाठीच राखून ठेवावीत. या कामांना किंमतीची मर्यादा नसावी. सर्व जंगलकामे जंगल मजूर सहकारी संस्थांना देण्यात यावीत तसेच ज्या ज्या ठिकाणी राज्यसंचलित महामंडळे रोजंदारीवर मजूर कामावर घेऊन काम करीत आहेत ती सर्व कामे न चुकता जंगल मजूर सहकारी संस्थांमार्फतच करून घ्यावीत.

२०. ट्रस्ट, नगरपालिका, पंचायत समिती व सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांनी मजूर सहकारी संस्थांना कामाच्या संदर्भातील सर्व सोयी व सवलती द्याव्यात.

२१. मजूर सहकारी संस्थांच्यासाठी पाच लाख रूपयापर्यंतची कुशल कामे राखून ठेवावीत.

२२. जर दुस-या भागातील एखादा मजूर सहकारी संस्थेस त्याठिकाणी कामे दिली तर त्या ठिकाणची मजूर सहकारी संस्था व ही संस्था त्यांच्यामध्ये अयोग्य स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी ज्या त्या भागातील कामे ज्या त्या भागातीलच मजूर सहकारी संस्थांना देण्यात यावीत. कामे देणा-या खात्याच्या अधिका-यांच्या समितीने स्थानिक बाजार दर, किमान वेतन कायदा आणि कामगारांना वेळोवेळी लागू पडणारे इतर संबंधित कायदे लक्षात घेऊन मजूर सहकारी संस्थांना कामे द्यावीत.

२३. भारत सरकारने राष्ट्रीय मजूर सहकारी संस्थांच्या संघाला भारतातील सार्वजनिक व खाजगी कंपन्यामध्ये किंवा परकीय कंपन्यांत आवश्यक असणा-या मजूर आणि तंत्रज्ञांना काम देणारी संस्था म्हणून मान्यता द्यावी.

२४. मजूर सहकारी संस्थांच्या व्यवसायिक कार्यात सहभागी होण्यासाठी त्यांना तांत्रिक सेवा उपलब्ध करून देता याव्यात व त्यांची प्रगती करता यावी आणि मजूर सहकारी संस्थांचे भाग भांडवलात सहभागी होता यावे यासाठी राष्ट्रीय मजूर सहकारी संस्थांच्या संघाला भारत सरकारने १०० टक्के आर्थिक सहाय्य करावे.

२५. राष्ट्रीय मजूर सहकारी संस्थांच्या संघानी त्यांची माल चढविण्याची, उतरविण्याची आणि बांधकामाची इ. कामे मजूर सहकारी संस्थांच्या मार्फत करून घ्यावीत. विविध स्तरावरील मजूर सहकारी संस्थांनी इतर क्षेत्रातील सर्व स्तरावरील सहकारी संस्थांशी समन्वय व सहकार्य प्रस्थापित करून त्यांची कामे योग्य दरात करावीत.

२६. मजूर सहकारी संस्थांच्या सभासद मजूरांना तांत्रिक शिक्षण व सहकार शिक्षणाचा लाभ मिळावा म्हणून मजूर सहकारी संस्थांना केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा.

२७. मजूर सहकारी संस्थांच्या संदर्भातील राष्ट्रीय सल्लागार मंडळाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी राज्य सरकारे करतात की नाही याची खात्री केंद्र सरकारने करून घ्यावी .

२८. नवीन २० कलमी कार्यक्रमाच्या विशेष संदर्भात केंद्र सरकारने मजूर सहकारी संस्थांच्या विकासासाठी एक योग्य अशी बाहयरचना तयार करावी.

२९. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, आंतरराष्ट्रीय सहकारी संघटन यासारख्या आंतरराष्ट्रीय उपसंघटनांनी भारतातील मजूर सहकारी संस्थांना मदत करण्यासाठी विशिष्ट असे कार्यक्रम तयार करावेत. आग्नेय आशियामधील मजूर सहकारी संस्थांसाठी त्यांनी एक स्थायी समिती (Standing Committee) स्थापन करावी.

<u>आधार -</u>

१. राजाभाऊ कुसाळकर - "महाराष्ट्रातील मजूर सहकारी चळवळ" सहकारी महाराष्ट्र, सहकारी सप्ताह विशेषांक नोव्हेंबर १९८५ पान क्रमांक १३ ते २०.

२. वि. शं. नारवे - "मजूर सहकारी संस्था - आत्मपरीक्षणाची गरज" सहकारी महाराष्ट्र - सप्टेंबर १९८४ पान क्रमांक १५ ते १७

३. संपादकीय - "श्रमाचा योग्य मोबदला मजूरांना मिळाला पाहिजे"
सहकारी महाराष्ट्र, जुलै १९८५ - पान क्रमांक २, ३.

४. T. N. Hajela - Principles, Problems and
practice of Co-operation.
Publishers - Shivalal Agarwala and Company.
1985. P. NO - 565 to 570.